पेजिनेशनसाठी अनुभवी व्यक्ती पाहिजे
GRAPHIC DESIGNER
Send Resume on Whatsapp
Contact : 7720046005

दैनिक
# युवावार्ता
परिवर्तनाचा पुरस्कर्ता

Web : www.yuvavarta.in/com
Mail : dailyyuvavarta@gmail.com
RNI No. MAHMAR/2007/24252
तिकीट न लावण्याचा
पोष्ट परवाना : WPP - 264
पोष्टाचा परवाना क्रमांक
BII/RNP/SRP/25/2023-25

विश्वास पिढ्यान् पिढ्यांचा
9601222777
9615222777
काजळे ज्वेलर्स
सोने
चांदी
हिरे
नवरत्न
बस स्टँड कॉम्प्लेक्स, संगमनेर

अहिल्यानगर । वर्ष १९ वे । अंक १६३ । किंमत - ५ रू संपादिका - सुशीला किसन हासे (बी.ए.) । संस्थापक - किसन भाऊ हासे (बी.जे.) ९८२२०३९४६० । कार्य. संपादक - सुदीप किसन हासे (एम.ई.कॉम्प.) मंगळवार ०७ /०७/२०२६ । पाने - ६

लग्नाचा बस्ता.. राजेन्द्रमध्ये बांधा!
मेन रोड, संगमनेर. फोन : 02425-225740, 7901031155
१९५९ पासून
विश्वासाची सार्थ परंपरा...
राजेन्द्र

# राज्यासह भंडारदरा पाणलोटात पावसाचे तांडव

## घाटघरला बरसला १४० मिमी पाऊस
## भंडारदरा धरणात ३५५ दलघफू पाणी साठा


छाया – विलास तुपे, राजूर

युवावार्ता (प्रतिनिधी)

राजूर - उत्तर अहिल्यानगर जिल्ह्याचे जीवनमान समृद्ध करणाऱ्या भंडारदरा धरणाच्या पाणलोट क्षेत्रात पावसाने अक्षरशः तांडव घातले आहे. गेल्या २४ तासांत झालेल्या मुसळधार पावसामुळे भंडारदरा धरणात तब्बल ३५५ दशलक्ष घनफूट (एमसीएफटी) नव्या पाण्याची आवक झाली असून धरणाचा पाणीसाठा ३,८९९ दशलक्ष घनफूट इतका झाला आहे. परिणामी धरण ३५.३२ टक्के भरले आहे. जिल्ह्याची 'चेरापुंजी' म्हणून ओळख असलेल्या घाटघर येथे तब्बल १४० मिमी (सुमारे सहा इंच) पावसाची नोंद झाली असून संपूर्ण परिसर दाट धुक्याच्या चादरीत हरवून गेला आहे.

राज्यभर सुरू असलेल्या मुसळधार पावसाने जनजीवन अक्षरशः विस्कळीत झाले आहे.

**संगमनेर शहर व तालुक्यात गेल्या चार दिवसांपासून संततधार पाऊस कोसळत आहे. तर आज सोमवारी मुसळधार पावसाने संपूर्ण जनजीवन विस्कळीत झाले आहे. तालुक्यातील अनेक भागात मुसळधार पाऊस कोसळत असून शेतकरी सुखावला आहे. या पावसामुळे पाण्याचे संकट टळले असून शेतीला उभारी मिळणार आहे. नाशिक-पुणे पट्ट्यात सुरू असलेल्या मुसळधार पावसामुळे चाकण जवळ महामार्ग पाण्यात गेला असून या मार्गावरील वाहतूक बंद करण्यात आली आहे.**

मुंबई, ठाणे, रायगड, पालघर, पुणे, सातारा, अहिल्या नगर, नाशिकसह कोकणातील अनेक जिल्ह्यांमध्ये अतिवृष्टीमुळे पूरस्थिती निर्माण झाली असून अनेक रस्ते, पूल आणि महामार्ग बंद झाले आहेत. या पार्श्वभूमीवर भारतीय हवामान विभागाने (खचऊ) मुंबई महानगर क्षेत्रासह काही जिल्ह्यांसाठी रेड अलर्ट जारी केला आहे. परिस्थितीचे गांभीर्य लक्षात घेऊन राज्य सरकारने खासगी कार्यालयांना 'वर्क फ्रॉम होम' करण्याचे निर्देश दिले असून अत्यावश्यक सेवा वगळता सरकारी व निमसरकारी कर्मचाऱ्यांना दुपारनंतर अर्धा दिवसाची सुटी जाहीर करण्यात आली आहे.

अकोले तालुक्यातील भंडारदरा धरणाच्या पाणलोटात गेल्या तीन दिवसांपासून मुसळधार पावसाची अखंड बरसात सुरू आहे. या संततधार पावसामुळे डोंगर-दऱ्यांमधून असंख्य धबधबे फेसाळत कोसळू लागले असून ओढे-नाले दुथडी भरून वाहत आहेत. त्यामुळे भंडारदरा धरणाच्या पाणीसाठ्यात झपाट्याने वाढ होत आहे.


मुसळधार पावसामुळे आदिवासी भागातील जनजीवन विस्कळीत झाले आहे. अनेक ठिकाणी नागरिकांना पाळीव जनावरे घरातच बांधून ठेवावी लागत आहेत. हवेत गारठा निर्माण झाल्याने घराघरांत शेकोट्या पेटल्या असून संपूर्ण परिसरात पावसाळी वातावरणाची अनुभूती येत आहे. (पान ४ वर)



## मिसिंग लिंक बोगद्यातून धो-धो पाणी

**द्रुतगती महामार्गावरील बहुचर्चित 'मिसिंग लिंक' प्रकल्प पुन्हा वादाच्या भोवऱ्यात सापडला आहे. काही दिवसांपूर्वी नव्या मार्गावर खड्डे पडल्याची चर्चा सुरू असतानाच, सोमवारी पहाटे मिसिंग लिंकच्या एन्ट्री पॉईंटजवळ स्लॅबचा काही भाग कोसळला. डोंगरावरील माती आणि पाण्याचा मोठा लोंढा रस्त्यावर आल्याने सुरक्षेच्या कारणास्तव या मार्गावरील वाहतूक तात्पुरती बंद करण्यात आली आहे.**

# संपादक बाबा शिंगोटे चौकाचे मुंबईत नामकरण



मुंबई (वृत्तसंस्था)

दै. 'पुण्यनगरी' वृत्तपत्र समूहाचे संस्थापक स्व. मुरलीधर ऊर्फ बाबा शिंगोटे यांच्या स्मरणार्थ लालबाग येथील चौकाचे 'पुण्यनगरीकार मुरलीधर ऊर्फ बाबा शिंगोटे चौक' असे नामकरण करण्यात आले आहे. या चौकाचे अनावरण मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या हस्ते सोमवार, ६ जुलै २०२६ रोजी सकाळी मोठ्या उत्साहात पार पडले.

स्व. बाबा शिंगोटे यांनी दुर्दम्य जिद्द आणि कठोर परिश्रमातून उद्योगाचे साम्राज्य निर्माण केले. संपूर्ण महाराष्ट्रात त्यांनी दै. 'पुण्यनगरी' वृत्तपत्र समूहाचा विस्तार केला. त्यांच्या नावे असलेल्या चौकाच्या अनावरणास मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्यासह उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे, कॅबिनेट मंत्री तथा मुंबई शहराचे पालकमंत्री मंगलप्रभात लोढा, महापौर रितू तावडे, जिल्हाधिकारी आंचल गोयल, मुंबई महापालिका आयुक्त आश्विनी भिडे यांच्या सह अनेक मान्यवर उपस्थित होते.

# भटक्या कुत्र्यांच्या त्रासातून लवकरच संगमनेरकरांची सुटका -आ. तांबे

युवावार्ता (प्रतिनिधी )

संगमनेर - येत्या काही दिवसातच भटक्या कुत्र्यांच्या त्रासातून संगमनेर करांची १००% मुक्तता होईल असा विश्वास आमदार सत्यजित तांबे यांनी येथे व्यक्त केला. संगमनेर नगरपालिकेच्या वतीने मालपाणी परिवार चॅरिटेबल ट्रस्टच्या भरीव आर्थिक सहयोगातून मालपाणी फार्मच्या आवारात उभारलेल्या सुसज्ज श्वान निर्बिजीकरण शस्त्रक्रिया व अँटी रेबीज लसीकरण केंद्राचा शुभारंभ आमदार तांबे यांच्या हस्ते करण्यात आला त्याप्रसंगी ते बोलत होते. यावेळी नगराध्यक्षा मैथिली तांबे, उपनगराध्यक्ष नूर मोहम्मद शेख, माजी नगराध्यक्षा सौ. दुर्गाताई तांबे, आरोग्य समितीचे सभापती किशोर टोकसे, मुख्याधिकारी दयानंद गोरे, मालपाणी उद्योग समूहाचे संचालक



मनीष मालपाणी जय मालपाणी, मालपाणी फार्मच्या संचालिका रचना मालपाणी आदींसह अनेक नगरसेवक नगरसेविका व सामाजिक कार्यकर्ते उपस्थित होते.

माजी नगराध्यक्षा सौ. दुर्गाताई तांबे यांच्या वाढदिवसाचे औचित्य साधून आज या केंद्राचा उद्घाटन सोहळा आयोजित करण्यात आला होता. कार्यक्रमाच्या सुरुवातीलाच केक कापून आणि शुभेच्छा पर गीत सादर करून सर्वांनी सौ. तांबे यांना शुभेच्छा दिल्या. आमदार सत्यजित तांबे म्हणाले ' संगमनेर शहरातील नागरिकांकडून भटक्या कुत्र्यांच्या त्रासाबाबत वारंवार तक्रारी येत होत्या. सर्वोच्च न्यायालयाने भटक्या कुत्र्यांच्या बाबतीत अत्यंत काटेकोर अशी मार्गदर्शक तत्व जाहीर केलेली आहेत. त्या तत्त्वांचे तंतोतंत पालन करून तसे केंद्र उभारण्याचा निर्णय संगमनेर नगरपालिकेने घेतला. आणि मालपाणी परिवार चॅरिटेबल ट्रस्टने त्या उभारणीसाठी सढळ हाताने मोठा भरीव सहयोग दिला. त्यामुळेच हे केंद्र उभारणे शक्य झाले. येथील उपचारांमुळे, नसबंदीच्या शस्त्रक्रियेमुळे भटक्या कुत्र्यांच्या संख्येवर नियंत्रण तर येईलच; मात्र त्यांना पुन्हा सोडून दिल्यानंतर देखील त्यांच्यामधील हिंस्रपणा नाहीसा झालेला असेल त्यामुळे ते समाजाला उपद्रव देऊ शकणार नाही. प्रायोगिक तत्त्वावर सुरू केलेला हा उपक्रम नक्कीच यशस्वी ठरेल. मालपाणी परिवाराने जागेची आणि निधीची सर्वात महत्त्वाची अडचण सहज रीतीने दूर केली त्यामुळे हे शक्य झाले. आगामी पाच सहा महिन्यांमध्ये युनिव्हर्सल कंपनीच्या माध्यमातून संगमनेर शहर परिसरात असलेले सुमारे दोन हजार भटके कुत्रे माणसांसाठी अजिबात धोकादायक ठरणार नाहीत अशा पद्धतीने त्यांच्यावर टप्प्याटप्प्याने उपचार केले जातील. नगरसेविका रचना मालपाणी यांनी हा उपक्रम सुरू करण्यामध्ये अत्यंत मोलाची भूमिका बजावली. सर्वच प्रकारच्या भटक्या जनावरांसाठी संगमनेर नगरपालिकेने वनखात्याकडे अडीच एकर जागेची मागणी रीतसर केलेली आहे. येत्या काही महिन्यातच ती जागा नगरपालिकेकडे वर्ग होईल. त्या ठिकाणी केवळ कुत्रीच नव्हे तर डुक्कर, गाढव, गाई इत्यादी सर्व मोकाट भटक्या जनावरांची व्यवस्था केली जाईल. हे केंद्र देशामध्ये आदर्श ठरणारे असेल. (पान २ वर)

ॲडव्हान्स गोल्ड एस.आय.पी. योजना
२०२६-२७
आजची छोटी बचत... उद्याची मोठी सोन्याची खरेदी!
आताच गोल्ड एस.आय.पी. सुरू करा आणि २०२७ च्या
अक्षयतृतीयेला आपल्या आवडीचे
दागिने घरी न्या.
: उपलब्ध योजना :
मजुरी फ्री / एक्स्ट्रा बोनस एस.आय.पी.
फिक्स भाव बुकिंग एस.आय.पी.
फ्लेक्सिबल भाव बुकिंग एस.आय.पी.
SIP ऑनलाईन सुविधा उपलब्ध.
सोने । चांदी । हिरे
अशोक चौक, संगमनेर
फोन : 02425-225924
मो : 9372012044
OM MAYUR JEWELLERS
ओममयूर ज्वेलर्स
आपुलकीने यावे विश्वासाने न्यावे




PBM Jewellers
मे.पोपट भगिरथ महाले ज्वेलर्स (सराफ)
भव्य मंगळसूत्र महोत्सव
फक्त आपल्या लाडक्या PBM ज्वेलर्स मध्ये
यामध्ये नवनवीन डिझाईन् आणि
व्हरायटीचे मंगळसूत्र त्याच प्रमाणे
जुन्या 22 कॅरेट सोन्याच्या
एक्सचेंज वर 0% घट
अशोक चौक, गुंडेचा हॉस्पिटल समोर,चावडी जवळ, संगमनेर
7599996999/ 8265036807

Km HOSPITAL
विश्वसनीय उपचारांची परंपरा
अत्याधुनिक वैद्यकीय सेवा
माफक दरात - संगमनेर येथेच
105 बेड्स
तज्ञ डॉक्टर्स
अत्याधुनिक सुविधा
कॅशलेस सुविधा किंवा मेडिक्लेम सुविधा उपलब्ध
हृदय विकार, समर्पित स्त्रीरोग विभाग, अस्थिरोग, अपघात विभाग, मूत्रविकार, सांधे प्रत्यारोपण शस्त्रक्रिया, मेंदू व मणके विकार शस्त्रक्रिया, लॅपरोस्कोपिक सर्जरी, गुदविकार उपचार व शस्त्रक्रिया, जनरल मेडिसिन, छातीचे विकार, पॅरालीसीस मधुमेह विकार, एंडोस्कोपिक स्पाइन सर्जरी, रोबोटिक सर्जरी, गुदविकार विभाग, अत्याधुनिक कॅथ लॅब, मॉड्युलर ऑपरेशन थिएटर- डायलिसिस प्लास्टिक सर्जरी सिटी स्कॅन, सोनोग्राफी विभाग
सर्व वैद्यकीय सेवा एकाच छताखाली 02425 - 226532/33
पत्ता - सदाशंकर नगर, पोफळे मळा, बी.एड. कॉलेज जवळ, अकोले बायपास रोड, संगमनेर
एकत्रित आयुष्यमान भारत-प्रधानमंत्री जन आरोग्य योजना व महात्मा ज्योतिराव फुले जन आरोग्य योजना
9953299532
आजच संपर्क करा
24/7 Emergency Services

# माजी मंत्री बाळासाहेब थोरात यांच्याकडून संत निवृत्तीनाथ महाराज पालखीचे स्वागत



युवावार्ता (प्रतिनिधी)

संगमनेर -रिमझिम पावसाच्या धारा, हिरवाईले नटलेला सुंदर परिसर, विठू नामाचा गजर, टाळ मृदुंगाच्या गजरात शेकडो वर्षाची परंपरा असलेल्या श्री संत निवृत्तीनाथ महाराज पालखीचे आज अहिल्यानगर जिल्ह्यात आगमन झाले. यावेळी अत्यंत भक्तीमय वातावरणात वारकरी संप्रदायाचे पाईक महाराष्ट्राचे वरिष्ठ नेते माजी महसूल मंत्री बाळासाहेब थोरात यांनी या पालखीचे अहिल्यानगर जिल्ह्यात स्वागत व पूजन केले.

पारेगाव बु. येथे पंढरपूरसाठी निघालेल्या या पालखीचे सुमारे वीस हजार वारकऱ्यांसमवेत आगमन झाले. यावेळी मा. कृषी व महसूल मंत्री बाळासाहेब थोरात, खासदार राजाभाऊ वाजे, डॉ. जयश्रीताई थोरात, कॅन्सरतज्ञ डॉ. हसमुख जैन, जिल्हा परिषदेचे मुख्य कार्यकारी अधिकारी आनंद भंडारी, अतिरिक्त पोलीस अधिकारी सोमनाथ वाकचौरे, डॉ. कुणाल सोनवणे, बी आर. चकोर, अविनाश सोनवणे हौशीराम सोनवणे, सुभाष सांगळे, संपतराव गोडगे, डॉ दत्तात्रय गडाख, ॲड त्रंबक गडाख, दौलतराव गडाख, सोमनाथ गडाख , दिंडीचे माधव महाराज राठी आदींसह विविध पदाधिकारी व मान्यवर उपस्थित होते.

त्र्यंबकेश्वर वरून निघालेल्या या वारीमध्ये सुमारे वीस हजार वारकरी या दिंडीमध्ये सहभागी झालेले आहेत. मोठ्या आनंदाने व भक्तिभावाने या वारकऱ्यांनी हरिनामाचा गजर करत टाळ मृदुंगाच्या तालावर विविध अभंग गात आज जिल्ह्यात प्रवेश केला. लेझीम पथक, पारंपारिक वाद्य व विद्यार्थ्यांनी केलेली पारंपारिक वेशभूषा , स्वागताच्या कमानी नी नटलेला परिसर यांसह सर्व गावकऱ्यांनी व सह्याद्री विद्यालयाच्या विद्यार्थ्यांनी या पालखीचे स्वागत केले.

यावेळी बोलताना लोकनेते बाळासाहेब थोरात म्हणाले की, महाराष्ट्र ही संतांची भूमी आहे . वारकरी संप्रदायाला हजारो वर्षांची परंपरा आहे. वारकरी संप्रदाय हा सर्वांना सोबत घेऊन जाणारा आहे. यामध्ये जात-पात धर्म असा कोणताही भेदभाव नाही. शेतकरी बांधवांनी महाराष्ट्रातील सर्व नागरिकांसाठी पंढरीची वारी ही आनंदवारी असते.

पावसाला यावर्षी आता सुरुवात झाली आहे. मात्र अद्याप पाऊस पुरेसा नाही. दुष्काळाचे सावट आहे. हे सावट दूर होऊन संपूर्ण राज्यांमध्ये आणि देशांमध्ये यावर्षी सर्वत्र चांगला पाऊस पडावा .शेतकरी, नागरिक, आणि सर्व जनता सुखी समाधानी होऊ दे अशी प्रार्थना ही यावेळी काँग्रेस पक्षाचे नेते माजी कृषिमंत्री बाळासाहेब थोरात यांनी पांडुरंगाच्या चरणी केली. खासदार राजाभाऊ वाजे म्हणाले की, नाशिक आणि अहिल्यानगर जिल्ह्यामध्ये अनेक दिवसांपासून स्वागताची ही परंपरा आहे. पंढरीच्या वारीमध्ये कधीही भेदभाव नसतो. समतेचा संदेश या वारीतून दिला जातो. यावर्षी सर्वत्र चांगला पाऊस पडून महाराष्ट्रातील जनता सुखी होऊ दे अशी प्रार्थना त्यांनी केली

तर डॉ.जयश्री ताई थोरात म्हणाल्या की,विठ्ठलाची पायी वारी ही महाराष्ट्राची मोठी संस्कृती असून यामध्ये गोरगरीब लहान थोर सर्व सहभागी झालेले असतात. भेदभाव विसरून एकत्र येऊन आनंदाने तल्लीन होऊन पांडुरंगाच्या चरणी लीन होतात. ही महाराष्ट्राची मोठी सांस्कृतिक व धार्मिक परंपरा असून मागील वर्षी संगमनेर तालुक्यातील १००० युवकांनी या दिंडीमध्ये सहभाग घेतला होता. या निमित्ताने यावर्षीही राज्यात भरपूर पाऊस पडू दे शेतकरी सुखी होऊ दे अशी प्रार्थना ही कॅन्सर तज्ञ डॉ जयश्रीताई थोरात यांनी केली.

# चंपतराय यांची सुट्टी, बजरंगी भांगडा सांभाळणार जबाबदारी ?



नवी दिल्ली (वृत्तसंस्था)

अयोध्या येथील राम मंदिर ट्रस्टमध्ये सध्या मोठ्या प्रशासकीय उलथापालथी सुरू असून, ट्रस्टचे सरचिटणीस चंपत राय आणि डॉ. अनिल मिश्रा यांच्या राजीनाम्यावर आज सोमवारी शिक्कामोर्तब होण्याची दाट शक्यता आहे. मंदिराच्या देणगीमध्ये झालेल्या आर्थिक अनियमितता आणि चोरीच्या प्रकरणांनंतर हा निर्णय घेतला जात असल्याचे समजते. त्यांच्या जागी आता विश्व हिंदू परिषदेचे नेते बजरंग लाल भांगडा आणि कृष्ण मोहन यांच्याकडे ट्रस्टची मोठी जबाबदारी सोपवली जाण्याची चिन्हे आहेत.

बजरंग लाल भांगडा हे 'नालको' चे माजी अध्यक्ष राहिले असून त्यांना व्यावसायिक कामकाजाचा मोठा अनुभव आहे, त्यामुळेच सध्या मंदिराच्या अंतर्गत व्यवस्थेची जबाबदारी त्यांच्याकडे सोपवण्यात आली आहे.

राम मंदिर परिसरात आज होणाऱ्या या महत्त्वपूर्ण बैठकीत एसआयटीचा (डखढ) अंतरिम अहवाल, २०२५-२६ चा ऑडिट रिपोर्ट आणि नवीन सीईओची नियुक्ती यांसारख्या मुद्द्यांवर सविस्तर चर्चा होणार आहे. या बैठकीपूर्वी ट्रस्टचे कोषाध्यक्ष स्वामी गोविंद देवगिरी यांची वैदेही भवन येथे कृष्ण मोहन आणि बजरंग लाल भांगडा यांनी भेट घेतली, जे ट्रस्टमध्ये मोठ्या बदलांचे संकेत मानले जात आहेत. चंपत राय आणि अनिल मिश्रा यांच्या कार्यपद्धतीवर ट्रस्टच्या इतर सदस्यांमध्येही नाराजी होती. विशेषतः चंपत राय यांनी कोणाचाही सल्ला न घेता मनमानी कारभार केल्याचा आणि व्यावसायिकता न पाळल्याचा आरोप काही सदस्यांनी अनौपचारिकपणे केला आहे.

मंदिराच्या देणगीमध्ये झालेल्या चोरीच्या प्रकरणाने संपूर्ण देशाला धक्का दिला आहे. एसआयटीच्या अहवालानुसार, सीसीटीव्ही कॅमेऱ्यांमध्ये तब्बल ७० वेळा चोरीच्या घटना कैद झाल्या आहेत. चोरीची ही पद्धत इतकी टोकाची होती की, काही लोक चक्क पायमोज्यांमध्ये पैसे लपवून किंवा बाथरूममध्ये पैसे दडवून ते बाहेर नेत असत. या प्रकरणात आतापर्यंत आठ जणांना अटक करण्यात आली असून, त्यात प्राथमिक शिक्षक, माजी मेकॅनिक आणि बँक कर्मचाऱ्यांचा समावेश आहे. अवघ्या १५ हजार रुपये पगार असणाऱ्या अनुकल्प मिश्रा नावाच्या कर्मचाऱ्याने अवघ्या काही महिन्यांत ६५ लाखांचे घर बांधले, महागड्या एसयूव्ही गाड्या बुक केल्या आणि जमिनी खरेदी केल्याचे पोलीस तपासात समोर आले आहे.

# दारू बंद करा... नाहीतर आमचा संसार तुम्ही चालवा

## लिंगदेवच्या आदिवासी महिलांचा संताप अनावर

युवावार्ता (प्रतिनिधी)

लिंगदेव - अवैध दारूमुळे उद्ध्वस्त होत चाललेले संसार, रोजची मारहाण, मुलांच्या शिक्षणावर होणारा परिणाम आणि प्रशासनाच्या कथित निष्क्रियतेविरोधात अकोले तालुक्यातील लिंगदेव येथील आदिवासी ठाकर समाजातील महिलांनी एल्गार पुकारला आहे. अवैध दारू बंद करा, नाहीतर आमच्या मुलांचा आणि आमचा सांभाळ सरकारने करावा, अशी आर्त मागणी करत महिलांनी अकोले पोलिस ठाण्यावर धडक मोर्चा काढण्याचा निर्णय घेतला आहे.

विशेष म्हणजे, यापूर्वीही गावातील महिलांनी स्वतः पुढाकार घेत अवैध दारू विक्रीच्या ठिकाणी धाड टाकून हजारो रुपयांची देशी व विदेशी दारू पकडून पोलिसांच्या ताब्यात दिल्याचा दावा केला आहे. मात्र, त्यानंतरही गावात अवैध दारू विक्री सुरूच असल्याने महिलांमध्ये तीव्र संताप आहे.

महिलांना दारू सापडते, मग पोलिसांना का सापडत नाही? गावातील पोलिस पाटील आणि संबंधित यंत्रणा नेमके काय करत आहेत? असा सवाल आंदोलनकर्त्या महिलांनी उपस्थित केला आहे. या आरोपांबाबत पोलिस प्रशासनाची अधिकृत भूमिका अद्याप समोर आलेली नाही.

महिलांनी सांगितले की, दारूच्या व्यसनामुळे अनेक कुटुंबे उद्ध्वस्त झाली आहेत. दिवसभर कष्ट करून मिळवलेला पैसा दारूत उडवला जातो. रात्री दारूच्या नशेत महिलांना मारहाण, शिवीगाळ आणि मानसिक छळ सहन करावा लागतो. घरातील धान्य, संसारोपयोगी वस्तू विकून दारू पिण्याचे प्रकार वाढले असून मुलांचे शिक्षण आणि कुटुंबाचे भवितव्य धोक्यात आले आहे. त्यामुळे आता अवैध दारूविरोधात निर्णायक लढा उभारण्याचा निर्धार महिलांनी व्यक्त केला आहे.

या आंदोलनात आदिवासी ठाकर समाजातील नंदा कातोरे, लता गावडे, रुख्मिणी गांडाळ, गीता कातोरे, अर्चना कातोरे, उषा कातोरे, मंदाताई मेंगाळ, इंद्राबाई गांडाळ, संगीता कातोरे, संगीता गावडे, मंगल कातोरे, अनिता गावडे, गंगुबाई कातोरे यांच्यासह मोठ्या संख्येने महिला सहभागी झाल्या होत्या.

उद्याच्या मोर्चामध्ये अवैध दारू विक्री कायमस्वरूपी बंद करणे, संबंधितांवर कठोर कारवाई करणे आणि गावातील महिलांना सुरक्षित वातावरण उपलब्ध करून देण्याची मागणी करण्यात येणार असल्याचे आंदोलनकर्त्यांनी स्पष्ट केले आहे. या आंदोलनामुळे अकोले तालुक्यातील अवैध दारू विक्रीचा प्रश्न पुन्हा ऐरणीवर आला असून, आता पोलिस प्रशासन कोणती भूमिका घेते, याकडे सर्वांचे लक्ष लागले आहे.

# पान १ वरून - भटक्या कुत्र्यांच्या...

प्राणीप्रेमींना देखील माझी विनंती आहे की प्राण्यांवर जरूर प्रेम करा मात्र आपल्या प्राण्यांपासून इतरांना त्रास होणार नाही याचीही दक्षता घ्या.'

कार्यक्रमाचे प्रास्ताविक करताना फार्मच्या संचालिका नगरसेविका रचना मालपाणी म्हणाल्या संगमनेर मध्ये भटक्या श्वानांचा उपद्रव हा विषय खूप चर्चेला आलेला होता. त्यामुळे अनेक दिवसांपासून नगराध्यक्षा मैथिली तांबे यांच्याशी याबाबत काय करता येऊ शकेल यावर विचार मंथन सुरू होते. आमदार सत्यजित तांबे यांच्याशी देखील या विषयावर सखोल चर्चा झाली. त्या चर्चेतूनच त्यांनी युनिव्हर्सल ही या क्षेत्रात काम करणारी कंपनी सुचवली. या कामांमध्ये डॉ. शेळके आणि त्यांच्या पत्नी डॉ. स्वाती शेळके यांची बहुमोल मदत झाली. त्यांच्या अभ्यासपूर्ण मार्गदर्शनातून आणि मालपाणी परिवार चॅरिटेबल ट्रस्टच्या भरीव सहयोगातून संगमनेर नगरपालिके साठी हे अद्ययावत केंद्र उभारणे शक्य झाले. या केंद्रामध्ये भटक्या श्वानांवर निर्बिजीकरण शस्त्रक्रिया आणि अँटी रेबीज लसीकरण केले जाणार आहे. यासाठी अत्याधुनिक वातानुकूलित ऑपरेशन थिएटर उभारण्यात आले आहे. येथे आणल्या जाणाऱ्या सर्व श्वानांना दिला जाणारा आहार शिजवण्यासाठी किचन बनविण्यात आले आहे. एका पिंजऱ्यामध्ये दहा श्वान राहू शकतील असे सुटसुटीत आणि स्वच्छ पिंजरे तयार करण्यात आलेले आहेत. पाच दिवसात किमान सत्तर श्वानांचे निर्बिजीकरण व अँटी रेबीज लसीकरण करण्याची या केंद्राची क्षमता आहे.

या केंद्रामुळे संगमनेरकरांना होणारा भटक्या कुत्र्यांचा त्रास मोठ्या प्रमाणात कमी होणार आहे. संगमनेर नगरपालिकेच्या वतीने इथून पुढे हे केंद्र चालविली जाणार असून आरोग्य समितीचे सभापती किशोर टोकसे आणि त्यांच्या सूचनेनुसार पालिका कर्मचारी येथे कार्यरत राहते राहतील' यावेळी सर्वच मान्यवरांनी फेरफटका मारून संपूर्ण केंद्राची पाहणी केली आणि संगमनेर मध्ये प्रथमच इतके अद्ययावत केंद्र सुरू केल्याबद्दल जागा उपलब्ध करून देणाऱ्या आणि मोठा निधी देणाऱ्या मालपाणी परिवाराचे आभार मानले.




संगमनेर नगरपरिषदेच्या
मा. नगराध्यक्षा
**मा. सौ. दुर्गाताई तांबे**
यांना वाढदिवस शुभेच्छा
दैनिक युवावार्ता


# सर्पदंश रोखण्यासाठी मोठे पाऊल

## महाराष्ट्रात उभारणार 'रिजनल व्हेनम बँक'




मुंबई (वृत्तसंस्था)

राज्यात सर्पदंश आणि त्यामुळे होणाऱ्या मृत्यूंचे प्रमाण रोखण्यासाठी त्याला 'नोटिफाईड डिसिज' (अधिसूचित आजार) म्हणून घोषित करण्याचा प्रस्ताव विधि व न्याय विभागाकडे पाठवला जाणार आहे. यासोबतच महाराष्ट्रातील सापांच्या प्रजातींनुसार अचूक लस विकसित करण्यासाठी हाफकिन संस्था, वनविभाग आणि इतर संबंधित यंत्रणांची बैठक घेऊन राज्यात 'रिजनल व्हेनम बँक' (प्रादेशिक सर्पविष बँक)स्थापन करण्याबाबत धोरणात्मक निर्णय घेतला जाईल, अशी घोषणा आरोग्यमंत्री प्रकाश आबिटकर यांनी बुधवारी विधानसभेत केली. या प्रक्रियेसाठी केंद्रातील तज्ज्ञांनाही पाचारण केले जाणार असल्याचे त्यांनी स्पष्ट केले.

विधानसभेत आमदार विक्रम पाचपुते यांनी लक्षवेधी सूचनेच्या माध्यमातून राज्यातील सर्पदंशाच्या घटना, वाढते मृत्यू आणि सर्पदंशरोधी लसींमधील सुधारणांचा मुद्दा उपस्थित केला होता. या चर्चेत आमदार श्वेता महाले, अर्जुन खोतकर आणि जयंत पाटील यांनीही सहभाग घेतला. आमदार विक्रम पाचपुते म्हणाले, राज्यात चार प्रमुख प्रकारचे विषारी साप आढळतात. प्रत्येक सापाचे विष हे हेमोटॉक्सिन (रक्ताभिसरण संस्थेवर परिणाम करणारे), न्यूरोटॉक्सिन (चेतासंस्थेवर परिणाम करणारे) आणि कायटोटॉक्सिन (कोशिकांवर परिणाम करणारे) अशा वेगवेगळ्या प्रकारांत मोडते. मात्र, साप कोणताही चावला तरी सध्या एकच 'पॉलिव्हॅलंट' (बहुविध) लस दिली जाते. परिसर बदलला की सापाची प्रजाती आणि त्याच्या विषाची तीव्रता बदलते. चेन्नईतील नाग आणि महाराष्ट्रातील नाग यात फरक आहे. परंतु, आपल्याकडे फक्त चेन्नईच्या सर्पविषापासून तयार केलेल्या लसी वापरल्या जातात. त्यामुळे राज्यात 'पॉलिव्हॅलंट'ऐवजी 'मोनोव्हॅलंट' (विशिष्ट प्रजातीसाठी एकच) लस तयार करण्यासाठी 'रिजनल व्हेनम बँक' उभारण्यात यावी. सर्पदंशाला 'पॅनडेमिक' (महामारी) घोषित करणार का, अशी विचारणाही पाचपुते यांनी केली.आमदार श्वेता महाले यांनी सांगितले की, शेतकरी आणि शेतमजूर मोठ्या संख्येने सर्पदंशाचे बळी ठरत आहेत. ग्रामीण रुग्णालयांमध्ये लसींचा पुरेसा साठा नसतो आणि तिथे आयसीयू सुविधाही उपलब्ध नसते. त्यामुळे सरकारने सर्पदंश प्रतिबंधासाठी स्वतंत्र आणि ठोस धोरण जाहीर करावे, अशी मागणी त्यांनी केली. सदस्यांच्या प्रश्नांना उत्तर देताना आरोग्यमंत्री आबिटकर (कशरश्रींह चळपळीींशी झीरज्ञरीह - लळींज्ञरी) यांनी सांगितले की, सध्या प्राथमिक आरोग्य केंद्र स्तरावर आयसीएमआरच्या मार्गदर्शक सूचनांनुसार सर्पदंश उपचार लसींचा पुरेसा साठा उपलब्ध आहे.

# एक हजार कोटींची उद्दिष्टपूर्ती हा संगमनेर मर्चंटच्या वाटचालीतील ऐतिहासिक क्षण - राजेश मालपाणी




युवावार्ता (प्रतिनिधी)

संगमनेर - हीरक महोत्सवी वर्षांमध्ये संगमनेर मर्चंट बँकेने ग्राहकांचा विश्वास या भक्कम भांडवलावर यशस्वीरित्या एक हजार कोटींचा संमिश्र व्यवसायाचा टप्पा पार करून अहमदनगर जिल्ह्यातील सहकारी बँकिंगच्या इतिहासात एक सोन्याचे पान लिहिले आहे. या ऐतिहासिक क्षणाचे मानकरी सर्व सभासद, ठेवीदार, खातेदार, कर्जदार, हितचिंतक आणि कार्यक्षम कर्मचारी अधिकारी हे आहेत असे गौरवोद्‌गार बँकेचे चेअरमन उद्योगपती राजेश मालपाणी यांनी येथे काढले.

१९६६ साली स्थापन झालेल्या बँकेच्या हीरक महोत्सवी वर्ष पर्वपूर्तीच्या निमित्ताने आयोजित करण्यात आलेल्या समारोप सोहळ्यामध्ये उपस्थितांना मार्गदर्शन करताना श्री. मालपाणी बोलत होते. यावेळी व्यासपीठावर हीरक महोत्सवी वर्षाचे चेअरमन राजेशजी मालपाणी, व्हा.चेअरमन मधुसूदन नावंदर, तसेच विद्यमान चेअरमन सीए संजयजी राठी, व्हा. चेअरमन रवींद्र पवार, प्रमुख व्याख्याते सीए प्रशांतजी रुणवाल, स्टाफ कमिटी चेअरमन संतोष करवा व बँकेचे सीईओ राजेंद्र सोनार साहेब आदी मान्यवर उपस्थित होते.

कुशल, कार्यक्षम आणि प्रामाणिक तसेच अत्याधुनिक तंत्रज्ञानाशी पूर्णपणे समरस झालेला प्रत्येक कर्मचारी-अधिकारी हा बँकेचा कणा आहे. या सर्वांच्या हातात बँकेचे भविष्य आहे. आगामी काळ हा प्रचंड स्पर्धेचा आहे. आपल्याला या स्पर्धेत केवळ टिकायचे नाही तर प्रगतीचा आलेख सातत्यपूर्ण रीतीने उंचावत न्यायचा आहे. हीरक महोत्सवी वर्षात ज्याप्रमाणे आपण १००० कोटींच्या व्यवसायाची लक्षपूर्ती करताना लक्ष्याहुन जास्त म्हणजे १०५५ कोटींचा संमिश्र व्यवसाय केला तसाच आगामी काळात आपल्याला वृद्धीचा संकल्प पूर्ण करायचा आहे असे श्री. मालपाणी म्हणाले.

श्री मालपाणी यांनी आपल्या भाषणामध्ये पडद्यावरील दृश्यांच्या सहाय्याने मागील क'ांतिकारक पंचवार्षिक पर्वाचा अभ्यासपूर्ण आढावा घेतला. बिनविरोध निवडणूक, स्टाफ सहकारी सामंजस्य करार, कर्मचारी परिवार विमा तसेच तातडीची वैद्यकीय मदत सुविधा, रजांचे रोखीकरण, प्रोत्साहनपर वार्षिक सहल, विविध परीक्षांसाठी उत्तेजन, कौशल्य वाढविणारी ऑनलाइन प्रशिक्षण शिबिरे इत्यादी गोष्टी सर्वांच्या समोर मांडल्या. नफा वृद्धी, व्यवसाय वृद्धी, लाभांश वृद्धी या तीनही गोष्टी आपल्याला सातत्याने सांभाळायच्या आहेत. स्वयंशिस्त हे एकत्रित प्रगतीचे सूत्र आहे असे ते म्हणाले. शिस्तीसाठी फाईव्ह एस, कैझेन, व्हिटॅमिन ए यांची प्रभावी अंमलबजावणी आपल्याला करायची आहे असेही त्यांनी सांगितले.

विद्यमान चेअरमन सीए संजय राठी सर यांनी चेअरमन नाईट ही संध्याकाळ एक अविस्मरणीय आणि अभिमानास्पद संध्याकाळ आहे. सर्वांच्या मेहनतीमुळे आपण या वर्षात हजार कोटींचे उद्दिष्ट पार केले पुढचे लक्ष सातत्याने सुदृढ वाढीचे असून आपल्याला तेही पूर्ण करायचे आहे. बँकेच्या स्टाफ साठी इन्सेंटिव्ह योजना यासह बँकेचे मोठ्या प्रमाणात ब्रॅण्डिंग करण्याचा उपक्रम बरोबर सुपरविज़नमध्ये मोठ्याप्रमाणावर सुधारणा करण्याचे आपण हाती घेणार आहोत. येत्या ५-१० वर्षात बँकिंग क्षेत्रात आणि इतर होणाऱ्या बदलाला आपल्याला सज्ज व्हावे लागणार आहे .संगमनेर मर्चंट बँकेने ६० वर्षात केलेली खरी कमाई म्हणजे ग्राहकांचा विश्वास असून ठेवींची सुरक्षितता, पारदर्शकता आणि गोपनीयता यापुढेही काटेकोरपणे पाळली जाईल आणि सर्वांच्या मदतीने प्रगतीचा हा रथ असाच वेगाने पुढे जात राहील असा मला विश्वास आहे.

हीरक महोत्सवी वर्षात विशेष चमक दाखविणारे राहुरी शाखेचे व्यवस्थापक राका, तब्बल १०६ वेळा नजरचुकीने जास्त आलेले पैसे ग'ाहकांना परत करणार्या महिला कर्मचारी सौ. सुनीता पडवळ, तुषार खांडरे निलेश शेणकर, राकेश गुंजाळ, आयटी मॅनेजर विठ्ठल कुलकर्णी यांना गौरव चिन्ह देऊन त्यांचा सत्कार करण्यात आला. पारितोषिकांचे निवेदन श्रीगोपाल पडताणी, सौ. कीर्ती करवा, प्रकाश कलंत्री, रवींद्र पवार, संदीप जाजू, सम्राट भंडारी यांनी केले. बँकेतील स्टाफ सहकाऱ्यांना हिरकमहोत्सवी भरघोस भेट जाहीर करण्यात आली व कार्यक्रम चालू असतानाच भेटीची रक्कम स्टाफचे खात्यात जमा करण्यात आली. अचानक मोबाईल वर भेट रक्कम जमा झाल्याने स्टाफ सहकारी आनंदीत दिसत होते.



संगमनेरकरांनी गौरविलेले

**।।जय श्रीराम।।**

**सुपर शॉपी**

निवडक किराणा, ड्रायफुट, कॉस्मेटिक

जीवन ज्योती, गणेशनगर, संगमनेर

एस. आर. थोरात दुध व बाय प्रोडक्टस्

**प्रोप्रा. अशोक रा. जाधव**

फोन (०२४२५) २२१७८८,२२३६२९, मोबा. ९८२२४२५५२२

क्रेडीट कार्ड व डेबिट कार्ड वापरण्याची सुविधा

शेतकऱ्यांचा श्वास ! ग्राहकांचा विश्वास !!




**दर्जेदार राजहंस दूध व दूधजन्य पदार्थ**

संगमनेर तालुका सह. दूध उत्पा. व प्रक्रिया संघ मर्या.

अमृतनगर (घुलेवाडी), ता. संगमनेर, जि. अहमदनगर

(०२४२५) २२५४१०, २२५५१०, २२६१६१, २२६१६२

www.rajhansmilk.com rajhansmilk@gmail.com

**धन्वंतरी**

We treat He cure's

मल्टिस्पेशालिटी हॉस्पिटल

डॉ. प्रविणकुमार पानसरे
मो. ९८२२३९७५७४

डॉ. दिपाली पानसरे
मो. ७४९९१७६८६४

उपलब्ध सुविधा

मेडिसीन विभाग, सर्जरी विभाग, अस्थिरोग विभाग, सुपर स्पेशालिटी सुविधा,स्त्रीरोग विभाग, न्युरो सर्जरी, प्लास्टिक सर्जरी, युरो सर्जरी, कॅन्सर सर्जरी

महात्मा ज्योतिबा फुले जन आरोग्य योजनेअंतर्गत

**डायलेसिस सुविधा उपलब्ध**

या योजनेअंतर्गत येणाऱ्या ऑपरेशनचा लाभ घेण्यासाठी आपले ओरिजनल आधार कार्ड व रेशनकार्ड असणे गरजेचे आहे

धन्वंतरी मल्टिस्पेशालिटी हॉस्पिटल, ताजणे मळा, नवीन नगर रोड, संगमनेर, जि. अ.नगर, फोन (०२४२५) २२७५७४, २२७५७५

**आपल्या व्यवसायाची जाहीरात येथे प्रसिद्ध करा**

संपर्क

८८३०५०८२४४ ८३८०९५६६०४

७६२०३८८२३०




# विशेष संक्षिप्त पुनरीक्षण अभियानात मतदारांनी सहभाग घ्यावा - सुधीर पाटील



युवावार्ता (प्रतिनिधी)

अहिल्यानगर - भारत निवडणूक आयोगाच्या निर्देशानुसार देशभर विशेष संक्षिप्त पुनरीक्षण अभियान राबविण्यात येत आहे. मतदार यादी अचूक, अद्ययावत व विश्वासार्ह ठेवण्यासाठी तसेच प्रत्येक पात्र नागरिकाचा मतदानाचा अधिकार सुनिश्चित करण्यासाठी हे अभियान अत्यंत महत्त्वाचे आहे.

अहिल्यानगर शहर विधानसभा मतदारसंघात हे अभियान मतदार नोंदणी अधिकारी तथा उपविभागीय अधिकारी सुधीर पाटील यांच्या मार्गदर्शनाखाली सुरू आहे. मतदान केंद्रस्तरीय अधिकारी घरोघरी भेट देऊन परिगणना प्रपत्रांचे वितरण व संकलन करीत असून मतदारांना आवश्यक माहिती देत अभियानाविषयी जनजागृतीही करीत आहेत.

याबाबत सुधीर पाटील यांनी नागरिकांना आवाहन केले आहे की, मतदान केंद्रस्तरीय अधिकारी आपल्या घरी भेट देतील, त्यावेळी त्यांना आवश्यक ते सहकार्य करावे. त्यांनी दिलेले परिगणना प्रपत्र काळजीपूर्वक भरून विहित मुदतीत जमा करावे. आवश्यक माहिती व कागदपत्रे वेळेत उपलब्ध करून दिल्यास मतदार यादी अद्ययावत करण्याचे कार्य अधिक वेगाने व अचूकपणे पूर्ण होण्यास मदत होईल.

ते पुढे म्हणाले की, विशेष संक्षिप्त पुनरीक्षण अभियान हे राष्ट्रीय स्तरावरील अत्यंत महत्त्वाचे अभियान आहे. अचूक मतदार यादी ही मुक्त, निष्पक्ष व पारदर्शक निवडणूक प्रक्रियेचा पाया आहे. त्यामुळे या अभियानात प्रत्येक पात्र नागरिकाचा सहभाग अत्यंत महत्त्वाचा आहे.

मतदार यादीतील माहिती अद्ययावत ठेवणे ही केवळ प्रशासनाचीच नव्हे, तर प्रत्येक नागरिकाचीही जबाबदारी आहे. त्यामुळे सर्व पात्र मतदारांनी या अभियानात सक्रिय सहभाग घेऊन मतदान केंद्रस्तरीय अधिकाऱ्यांना सहकार्य करावे, असे आवाहनही श्री.पाटील यांनी केले आहे.

# मॉडर्न हायस्कूल चेअरमनपदी कुलकर्णी

## ज्ञानवर्धिनी बालक मंदिरच्या चेअरमनपदी वैद्य तर प्रशासक अधिकारीपदी कचरे







युवावार्ता (प्रतिनिधी)

अकोले तालुक्यातील शैक्षणिक क्षेत्रासाठी अभिमानाची आणि आनंदाची बातमी समोर आली आहे. गुणवत्तापूर्ण शिक्षणाची परंपरा जपणाऱ्या व अकोले तालुक्यातील सर्वात जुन्या असलेल्या मॉडर्न हायस्कूल अकोलेच्या चेअरमनपदी सामाजिक कार्यकर्त्या सौ. प्रतिमा हेरंब कुलकर्णी यांची तर ज्ञानवर्धिनी बालक मंदिर या शैक्षणिक संस्थेच्या चेअरमनपदी ज्येष्ठ पत्रकार अमोल वैद्य यांची एकमताने निवड करण्यात आली. तर हिंद सेवा मंडळ संचलीत अकोले विभागाच्या प्रशासकीय अधिकारीपदी सेवानिवृत्त प्राचार्य संतोष कचरे यांची निवड करण्यात आली आहे.

प्रतिमा कुलकर्णी यांचे शिक्षण एम.ए. बी. एड. झाले असून यांनी शिक्षक म्हणून काम केले असून बाल आनंदवाडी ही प्रयोगशील बालवाडी अनेक वर्षे चालवली आहे. एकल महिलांच्या प्रश्नावर व त्यांच्या मुलांच्या शिक्षणासाठी सध्या काम करत आहेत. सामाजिक व विधायक उपक्रक्रमांत त्यांचा सक्रिय सहभाग असतो. त्यांची मॉडर्न हायस्कूलच्या चेअरमन पदी निवड करण्यात आली आहे.

अमोल वैद्य यांचे शिक्षण एम. ए.बी.एड. व डिप्लोमा जर्नालिझम झाले असून सध्या ते अखिल भारतीय मराठी पत्रकार परिषदेचे जिल्हाध्यक्ष म्हणून काम पाहत आहेत. तसेच सुगाव खुर्द गावचे माजी सरपंच, महात्मा गांधी तंटामुक्त समितीचे अध्यक्ष, रोटरी क्लब अकोलेचे संस्थापक आणि रोटरी इंटरनॅशनल डिस्ट्रिक्ट ३१३२ चे माजी असिस्टंट गव्हर्नर म्हणून त्यांनी सामाजिक, शैक्षणिक आणि विकासात्मक कार्यात उल्लेखनीय योगदान दिले आहे. त्यांच्या नेतृत्वक्षमतेची दखल घेत संस्थेने त्यांच्यावर चेअरमनपदाची जबाबदारी सोपविली आहे. तर सेवा निवृत्त प्राचार्य संतोष कचरे हे जनजाती कल्याण समितीचे जिल्हाध्यक्ष म्हणून काम पाहत आहेत.

त्यांच्या या निवडी बद्दल हिंद सेवा मंडळाचे मानत सचिव संजय जोशी, कार्याध्यक्ष सुमतीलाल कोठारी, संचालक दिलीपकुमार शहा, सचिव सहाय्यक योगेश देशमुख, मॉडर्न ज्युनियर कॉलेजचे चेअरमन, नगराध्यक्ष बाळासाहेब वडजे यांच्यासह मंडळाचे सर्व पदाधिकारी व स्थानिक स्कूल कमिटी सदस्य, पालक व विविध क्षेत्रातील नागरिकांनी त्यांचे अभिनंदन केले आहे.


रजि नं. ANR/SMR/BNK १२०७/८३ रजि. तारीख ७/६/१९८३

**सहकारमहर्षी भाऊसाहेब थोरात अमृतवाहिनी सहकारी बँक लि., घुलेवाडी**

पो. संगमनेर एस. के. (४२२६०८) ता. संगमनेर, जि. अहिल्यानगर फोन नं. ०२४२५) २२२७१३

## स्थावर मालमत्तेचा ताबा नोटिस (नमुना झेड)

### महाराष्ट्र सहकारी संस्था नियम १९६१ चा नियम (१०७(११) (ड)– १) १ अन्वये नोटीस

ज्याअर्थी कर्जदार यांनी सहकारमहर्षी भाऊसाहेब थोरात अमृतवाहिनी सहकारी बँक लि., घुलेवाडी यांचेकडून कर्ज घेतले आहे. सदर कर्ज घेताना आपण बँकेचे सभासद/नाममात्र सभासद झालेले आहात. ज्याअर्थी खालील कर्जदार यांनी घेतलेल्या कर्जाची परतफेड करण्यास कसूर केलेली आहे. ज्याअर्थी मा. उपनिबंधक, सहकारी संस्था, संगमनेर, जि. अहमदनगर यांनी आपल्याकडून येणे/थकीत असलेल्या रकमेची वसुली होण्याकरीता महाराष्ट्र सहकारी संस्था अधिनियम १९६० चे कलम १०१ (१) अन्वये वसुली करण्यासाठी वसुली दाखले निर्गमित केले आहेत. ज्याअर्थी सदरहू वसुली दाखला सहकारमहर्षी भाऊसाहेब थोरात अमृतवाहिनी सहकारी बँक लि., घुलेवाडी यांना अंमलबजावनी करण्यासाठी, वसुली अधिकारी, सहकारमहर्षी भाऊसाहेब थोरात अमृतवाहिनी सहकारी बँक लि., घुलेवाडीकडे पाठविला आहे. त्यानुसार खाली स्वाक्षरी करणार यांनी महाराष्ट्र सहकारी संस्था नियम १०७ (३) अन्वये मागणी नोटीस संबंधितांना पाठवून कर्ज रकमेची परतफेड करण्याचे निर्देश दिलेले आहेत, ज्याअर्थी अशा प्रकारे मागणी नोटीस बजावूनही संबंधितांनी कर्ज रकमेचा भरणा विहीत मुदतीत व त्यानंतरही केलेला नाही. त्यामुळे खाली नमुद केलेल्या स्थावर मिळकती आदेशाने जप्त केलेल्या आहेत. ज्याअर्थी, संबंधित मिळकतीचे जप्ती आदेश देवूनही संबंधितांनी कर्ज रकमेचा भरणा न केल्याने संबंधित मिळकतीची जाहीर लिलावाने विक्री करणे आवश्यक आहे. त्यासाठी खाली स्वाक्षरी करणार यांनी संबंधित मिळकतींचे मुल्यांकन करुन घेण्याचे ठरविले असून मुल्यांकन करुन घेतल्यानंतर मा. जिल्हा उपनिबंधक सहकारी संस्था, अहमदनगर यांचेकडून सदर मिळकतींचे वाजवी मुल्य निर्धारित करण्यासाठी प्रस्ताव दाखल करणार आहेत. ज्याअर्थी खाली स्वाक्षरी करणार यांनी मालमत्ता जप्ती आदेशानुसार कारवाईपुर्वीची नोटीस देवूनही संबंधितांनी कर्ज रकमेचा भरणा केलेला नसल्याने सदर स्थावर मिळकतीचा ताबा घेवून तिची रितसर विक्री करणे अनिवार्य झालेले आहे. त्याअर्थी महाराष्ट्र सहकारी संस्था नियम १९६१ चा नियम १०७ ((११) (ड)- १) १ अन्वये खालील थकबाकीदार कर्जदार / जामीनदार/संमतीदार यांच्या निम्नलिखित स्थावर मालमत्तेचा खालील नोटीशीन्वये प्रतिकात्मक ताबा घेतला आहे व ताबा पंचनामा केला आहे. आणि या नोटीशीच्या तारखेनंतर सदर स्थावर मालमत्ता तबदिल केल्यास कोणतीही खाजगी हस्तांतरण, स्विकृत करण्यास किंवा बोजा निर्माण करण्यास अगर तारण देण्यास या नोटीशीन्वये मनाई करण्यात येत आहे.

**स्थावर मालमत्तेचे वर्णन व क्षेत्रफळ**

| अ नं | कर्जदार/संमतीदार/जामीनदार यांचे नाव | मौजे | गट नं. | क्षेत्र हे. आर | आकार |
|---|---|---|---|---|---|
| १ | कर्जदार - खेमनर चंद्रकांत म्हाळू | साकुर | १००२ | ०.२९ ख.०.०९ | ०.८१ |
| | | | १०१९/१ | ०.३४ ख.०.२२ | ०.५६ |
| | | | १०४७ | ०.०७ | ०.३७ |
| | | | ८०३ | ०.२६ | ०.१२ |
| | | | ८१३ | ०.४० | ०.४२ |
| | | | ९९६/२ | ०.४४ ख. ०.१६ | ०.९१ |
| | जामीनदार - खेमनर ठकाजी खंडू | साकुर | १००२ | ०.२९.०० पो. ख. ०.०९०० | ०.८१ |
| | | | १०४७ | ०.०७.०० | ०.३७ |
| | | | ८०३ | ०.३३.०० पो. ख. ०.१९.०० | ०.१६ |
| | | | ८१३ | ०.४९.०० पो. ख. ०.३०.०० | ०.५१ |
| | जामीनदार - खेमनर पाराजी खंडू | साकुर | १०४७ | ०.०८.०० | ०. ४३ |
| २ | कर्जदार - खेमनर प्रकाश पाराजी | | ८०३ पै | ०.५८ पो. ख. ०.२० | ०.२७ |
| | | | ८१३ पै | ०.६५ पो. ख. ०.१५ | ०.६८ |
| | जामीनदार - खेमनर ठकाजी खंडू | साकुर | १०४७ | ०.०७.०० | ०.३७ |
| | | | ८१३ | ०.४९.०० पो. ख. ०.३० | ०.५१ |
| | | | १००२ | ०.२९.०० | ०.८१ |
| | | | ८०३ | ०.३३.०० पो. ख. ०.१९.०० | ०.१६ |
| | जामीनदार - खेमनर विलास चंद्रकांत | साकुर | ८१३ | ०.४० | ०.४२ |
| ३ | कर्जदार- दिघे पोपट दत्तू | जोर्वे | ३३७ पै | ०. ३५.०० | १.७८ |
| | सहकर्जदार/ जामीनदार - दिघे भिमराव भागवत | जोर्वे | ३७३ पै | ०. ३३.०० | १.६८ |
| | | | ४८४ | ०.२३ ख.०.०९ | ०.२९ |
| | जामीनदार - दिघे सोपान रभाजी | जोर्वे | ४५० | ०.०५.०० | ०.२७ |
| | | | ४७० | ०.२६.०० | ०.९ |

विशेष करून कर्जदार, जामीनदार आणि सर्व नागरिकांना याद्वारे सावध करण्यात येते की, वरील जप्त केलेल्या मालमत्तेशी संबंधित कोणताही व्यवहार करू नये आणि व्यवहार केल्यास उपरोक्त कर्जदार आणि जामीनदार यांच्या कर्जाच्या बोजाची रक्कम आणि त्यावरील व्याज व इतर सर्व खर्च याला अधीन रहावे लागेल. सदर ताबा नोटीस कर्जदार, जामीनदार यांना रजिस्टर पोस्टाने दिली आहे. सदरची नोटीस माझ्या सहीनिशी व मुद्रेसह दि. २९/०४/२०२६ रोजी पाठविली आहे.

* टीप- वरील सर्व स्थावराच्या चतुः सिमा नकाशाप्रमाणे आहेत.

दि. :– ०६/०७/२०२६

ठिकाण – मुख्य कार्यालय, घुलेवाडी

शिक्का

सौ. घुले एस. ए.
वसुली अधिकारी
सह. भा. थो. अमृतवाहिनी बँक


# केवळ एका शीतपेयावर बंदी नव्हे

## तरुणाईला व्यसनाच्या विळख्यातून मुक्त करण्याची वेळ आली आहे !




राज्य सरकारने शाळांच्या ५०० मीटर परिसरात 'स्टिंग' या शीतपेयाच्या विक्रीवर बंदी घालण्याचा निर्णय घेतला आहे. विद्यार्थ्यांच्या आरोग्याच्या दृष्टीने उचललेले हे पाऊल स्वागतार्ह असले, तरी केवळ एका ब्रँडवर बंदी घालून सरकारचे कर्तव्य संपत नाही. उलट, हा निर्णय अधिक व्यापक आणि सर्वसमावेशक धोरणाची गरज अधोरेखित करतो.

जर 'स्टिंग' विद्यार्थ्यांसाठी हानिकारक असेल, तर बाजारात उपलब्ध इतर ऊर्जा पेये, साखरयुक्त शीतपेये आणि तत्सम उत्पादने कितपत सुरक्षित आहेत? याबाबत सरकारने स्पष्ट भूमिका मांडली पाहिजे. विद्यार्थी, पालक आणि शिक्षकांना या उत्पादनांतील घटक, त्यांचे दुष्परिणाम आणि आरोग्यावरील परिणाम यांची वैज्ञानिक माहिती दिली गेली पाहिजे. जनजागृतीशिवाय केवळ बंदीचा फारसा उपयोग होत नाही. १९७७ मध्ये तत्कालीन केंद्रीय मंत्री जॉर्ज फर्नांडिस यांनी कोकाकोलावर बंदी घातली होती. त्यामागे गुणवत्ता आणि राष्ट्रीय हिताचा मुद्दा होता. काही वर्षांनी ती बंदी उठली आणि कंपनी पुन्हा भारतात दाखल झाली. इतिहास सांगतो की, केवळ बंदी हा कायमस्वरूपी उपाय नसतो; प्रभावी अंमलबजावणी, जनजागृती आणि कठोर नियमन यांची जोड आवश्यक असते. आज शाळा आणि महाविद्यालयांच्या परिसरात असंख्य पानटपऱ्या आणि दुकाने उभी आहेत. या दुकानांत शीतपेयांसोबतच तंबाखूजन्य पदार्थ, ई-सिगारेटसदृश उत्पादने आणि इतर व्यसनाधीनतेला खतपाणी घालणाऱ्या वस्तू सहज उपलब्ध होतात. सरकारची कारवाई अनेकदा केवळ कागदोपत्री राहते. ज्या अधिकाऱ्यांनी कठोर भूमिका घेतली, त्यांनी काही ठिकाणी पानटपऱ्यांवर कारवाई केली; पण राज्यभर सातत्यपूर्ण मोहिमेचा अभाव आजही जाणवतो.

याहून गंभीर बाब म्हणजे बहुराष्ट्रीय कंपन्यांच्या आक्रमक जाहिराती. चित्रपटसृष्टीतील लोकप्रिय कलाकार, सोशल मीडियावरील प्रभावशाली व्यक्ती आणि आकर्षक मार्केटिंगच्या माध्यमातून तरुणाईला या उत्पादनांकडे खेचले जाते. व्यसनाला 'कूल' आणि 'स्टायलिश' स्वरूप दिले जाते. परिणामी, अनेक युवक-युवती नकळत या सापळ्यात अडकतात. आज मोठ्या शहरांपासून मध्यम शहरांपर्यंत वसतिगृहांमध्ये राहणाऱ्या तरुण-तरुणींमध्ये धूम्रपान, वेपिंग आणि इतर व्यसनांचे प्रमाण चिंताजनकरीत्या वाढत असल्याचे चित्र दिसते. शिक्षणासाठी घरापासून दूर राहणाऱ्या विद्यार्थ्यांवर पालकांचे नियंत्रण कमी होते आणि चुकीच्या सवयी सहज रुजतात. हा केवळ वैयक्तिक प्रश्न नसून सामाजिक आरोग्याचा गंभीर विषय आहे.

या व्यसनाधीनतेचे परिणाम दूरगामी आहेत. शारीरिक आणि मानसिक आरोग्य बिघडते, कौटुंबिक मूल्ये ढासळतात, नातेसंबंधांवर परिणाम होतो आणि भविष्यातील वैवाहिक व कौटुंबिक जीवनावरही त्याचे दुष्परिणाम दिसू लागतात. त्यामुळे हा विषय केवळ शीतपेयांचा किंवा एका ब्रँडचा नसून संपूर्ण तरुण पिढीच्या भवितव्याचा आहे. सरकारने घेतलेल्या निर्णयाचे स्वागत करतानाच आता पुढचे पाऊल अधिक धाडसी असले पाहिजे. शाळांच्या परिसरात सर्व प्रकारच्या आरोग्याला घातक उत्पादनांच्या विक्रीवर कठोर निर्बंध, जाहिरातींवर नियंत्रण, नियमित तपासणी, शालेय स्तरावर आरोग्य शिक्षण, पालक-शिक्षक जनजागृती आणि कायद्याची कठोर अंमलबजावणी या उपायांशिवाय परिस्थितीत बदल होणार नाही.

केवळ एका शीतपेयावर बंदी घालून सरकारने समाधान मानू नये. अन्यथा ज्या ब्रँडवर बंदी आली, त्यालाच अनावश्यक प्रसिद्धी मिळण्याचा धोका आहे. सरकारने व्यापक व्यसनमुक्ती धोरण आखून तरुणाईला सुरक्षित, सुदृढ आणि जबाबदार भविष्य देण्याची हीच योग्य वेळ आहे.

शिक्षणाचे वाढते बाजारीकरण, विद्यार्थ्यांच्या हातात येणारा वाढता पैसा, आक्रमक बाजारपेठ आणि व्यसनांना मिळणारे ग्लॅमर यांचा परस्परसंबंध सरकारने गांभीर्याने समजून घेतला पाहिजे. कारण भावी पिढीचे भविष्य सुरक्षित ठेवण्याची सर्वांत मोठी जबाबदारी सरकारचीच आहे. आज घेतलेले योग्य निर्णयच उद्याचा सशक्त भारत घडवतील.

# प्रलंबित मागण्यांसाठी उद्यापासून दोन दिवस शाळा बंद आंदोलन

नाशिक (प्रतिनिधी)

राज्यातील अंशतः अनुदानित आणि अनुदानित शाळांतील शिक्षक व शिक्षकेतर कर्मचाऱ्यांच्या प्रलंबित मागण्यांसाठी शिक्षक समन्वय संघाने मंगळवार, ७आणि बुधवार, ८ रोजी राज्यव्यापी शाळा बंद आंदोलनाची घोषणा केली आहे. या दोन दिवसांत शाळा बंद राहणार असून, शिक्षक मुंबईतील आझाद मैदानावर आयोजित आंदोलनात सहभागी होणार आहेत. शासनाकडे वारंवार पाठपुरावा करूनही कोणताही ठोस निर्णय न झाल्याने हा निर्णय घेण्यात आल्याची माहिती शिक्षक सेनेचे संजय चव्हाण यांनी दिली.

संघटनेच्या म्हणण्यानुसार, अनुदान, वेतन सुधारणा, सेवा नियमितीकरण आणि इतर आर्थिक मागण्यांबाबत शासनाने दखल घेतली नाही. यामुळे शिक्षक आणि कर्मचाऱ्यांमध्ये नाराजी निर्माण झाली आहे. राज्यातील सर्व जिल्ह्यांतील अंशतः अनुदानित व अनुदानित शाळांमधील शिक्षक व कर्मचाऱ्यांनी या आंदोलनात सक्रिय सहभाग घ्यावा, असे आवाहन करण्यात आले आहे. विद्यार्थ्यांच्या शिक्षणाचा एक-दोन दिवसांचा तोटा होईल. पण, दीर्घकाळ न्याय मिळवण्यासाठी हा त्याग आवश्यक असल्याचे संघटनेने स्पष्ट केले. शिक्षक समन्वय संघाने शासनाला इशारा दिला आहे की, प्रलंबित प्रश्न निकाली न काढल्यास आंदोलन अधिक तीव्र केले जाईल. प्रामाणिकपणे काम करणाऱ्या शिक्षकांना आर्थिक आणि प्रशासकीय न्याय मिळाला पाहिजे. शासनाने तातडीने सकारात्मक भूमिका घेऊन मागण्या मान्य कराव्यात, असे संघटनेचे मत आहे. आंदोलन शांततेत पार पाडण्यासाठी संघटनेने सर्व शिक्षकांना सूचना दिल्या आहेत. शासन लवकरात लवकर तोडगा काढेल, अशी अपेक्षा व्यक्त केली जात आहे.


**CHANGE IN NAME**

I HAVE CHANGED MY OLD NAME
BALU KARBHARI KAKAD

NEW NAME AS
BALASAHEB KARBHARI KAKAD

BY AFFIDAVIT NO 938/2026
DATE 16/07/2026
ADD-A/P JORVE TAL.
SANGAMNER -422605

# संपादकीय...

## वाढदिवस अभीष्टचिंतन...

# दूरदृष्टी, विकास आणि स्वच्छ प्रशासनाचा चेहरा माजी नगराध्यक्षा दुर्गाताई तांबे



संगमनेर शहराचा इतिहास हा केवळ राजकीय घडामोडींचा इतिहास नाही, तर दूरदृष्टी असलेल्या नेतृत्वाने घडविलेल्या विकासाचा इतिहास आहे. या विकासाच्या वाटचालीत अनेक नेत्यांनी आपले योगदान दिले, मात्र आपल्या कार्यकाळात शहराला नवी दिशा, नवी ओळख आणि नवे स्वप्न देणाऱ्या नेतृत्वामध्ये माजी नगराध्यक्षा दुर्गाताई तांबे यांचे नाव अत्यंत आदराने घेतले जाते. नगरपरिषदेच्या इतिहासात पहिल्या महिला नगराध्यक्षा होण्याचा मान त्यांना लाभला. परंतु हा केवळ इतिहासातील उल्लेख नाही, तर महिलांच्या नेतृत्वक्षमतेचा, निर्णयक्षमतेचा आणि विकासाभिमुख विचारांचा एक प्रेरणादायी अध्याय आहे. त्यांनी सिद्ध करून दाखवले की, विकासाला लिंगभेद नसतो; त्यासाठी आवश्यक असते ती इच्छाशक्ती, प्रामाणिकपणा आणि जनतेप्रती असलेली बांधिलकी. दुर्गाताई तांबे यांनी नगराध्यक्षपदाची सूत्रे हाती घेतल्यानंतर शहराच्या विकासाकडे सर्वसमावेशक दृष्टीने पाहिले. केवळ रस्ते, गटारी किंवा इमारती उभारणे म्हणजे विकास नसून, शहरातील प्रत्येक नागरिकाचे जीवन अधिक सुखकर, सुरक्षित, स्वच्छ आणि दर्जेदार बनविणे हीच खरी विकासाची संकल्पना असल्याचा त्यांचा ठाम विश्वास होता. त्यामुळे त्यांच्या प्रत्येक निर्णयामध्ये नागरिक केंद्रस्थानी राहिले.

त्यांच्या कार्यकाळात स्वच्छ व सुंदर संगमनेर - हरित संगमनेर ही संकल्पना प्रत्यक्षात उतरली. शहरातील उद्यानांची निर्मिती, हरित क्षेत्राचा विस्तार, सार्वजनिक ठिकाणांचे सुशोभीकरण, स्वच्छतेसाठी राबविण्यात आलेले उपक्रम आणि पर्यावरण संवर्धनासाठी घेतलेले निर्णय यामुळे संगमनेरची राज्यभर स्वतंत्र ओळख निर्माण झाली. शहरात विकसित करण्यात आलेली तब्बल २९ उद्याने, त्यामध्ये उभारण्यात आलेल्या ओपन जिमची सुविधा, ज्येष्ठ नागरिक, महिला आणि युवकांसाठी निर्माण झालेली आरोग्यदायी सार्वजनिक ठिकाणे ही त्यांच्या दूरदृष्टीची जिवंत उदाहरणे आहेत. स्वच्छ भारत अभियान आणि माझी वसुंधरा अभियानांतर्गत संगमनेर नगरपरिषदेला मिळालेले विविध पुरस्कार हे केवळ सन्मान नव्हते, तर शहरातील प्रत्येक नागरिकाच्या सहभागातून उभ्या राहिलेल्या विकास मॉडेलची राज्य आणि देशाने घेतलेली दखल होती. या यशामागे दुर्गाताईंचे नियोजन, प्रशासनावर असलेली पकड आणि सातत्यपूर्ण पाठपुरावा यांचा मोठा वाटा होता. महिलांच्या सक्षमीकरणासाठी त्यांनी केलेले कार्य विशेष उल्लेखनीय आहे. महिला बचत गटांना प्रोत्साहन, महिलांना स्थानिक स्वराज्य संस्थांमध्ये सन्मानाचे स्थान मिळावे यासाठी केलेले प्रयत्न आणि महिला नगरसेविकांना आत्मविश्वासाने काम करता यावे यासाठी दिलेले प्रोत्साहन यामुळे अनेक महिलांना सार्वजनिक जीवनात काम करण्याची प्रेरणा मिळाली. त्यांच्या नेतृत्वामुळे महिला प्रतिनिधींची प्रतिमा अधिक सक्षम आणि प्रभावी बनली. पायाभूत सुविधांच्या विकासातही त्यांच्या कार्याचा मोठा ठसा उमटलेला दिसतो. आधुनिक शॉपिंग कॉम्प्लेक्स, अद्ययावत अनंत फंदी नाट्यगृह, नगरपरिषदेची प्रशस्त प्रशासकीय इमारत, संगणकीकरण, शहरातील विविध विकासकामांना दिलेली गती, तसेच राष्ट्रीय महामार्गावर दुभाजक व पथदिव्यांच्या उभारणीसाठी केलेला सातत्यपूर्ण पाठपुरावा ही त्यांच्या कार्यकाळातील महत्त्वाची वैशिष्ट्ये ठरली. घनकचरा व्यवस्थापनाच्या क्षेत्रात त्यांनी दूरगामी विचार मांडला. शहरातील कंपोस्ट डेपोमध्ये साचणाऱ्या कचऱ्यावर प्रक्रिया करून ऊर्जा निर्मिती व सेंद्रिय खत निर्मितीचा प्रकल्प उभारण्याची संकल्पना त्यांनी पुढे रेटली. त्या काळात हा विचार अत्यंत आधुनिक आणि पर्यावरणपूरक मानला जात होता. शहराच्या भविष्यातील गरजा लक्षात घेऊन त्यांनी केलेले नियोजन आजही मार्गदर्शक ठरते. वीजवाहक तारा भूमिगत करण्यासाठी त्यांनी सातत्याने शासन स्तरावर पाठपुरावा केला. काही तांत्रिक कारणांमुळे हा प्रकल्प पूर्णत्वास जाऊ शकला नसला, तरी शहराच्या सुरक्षिततेसाठी आणि सौंदर्यासाठी त्यांनी केलेले प्रयत्न उल्लेखनीय राहिले. त्यांच्या नेतृत्वाची आणखी एक मोठी जमेची बाजू म्हणजे सर्वसमावेशकता. राजकारणात मतभेद असू शकतात; परंतु विकासामध्ये मतभेद नसावेत, हा त्यांचा दृष्टिकोन होता. त्यामुळे त्यांनी नगरपरिषदेमध्ये सर्व नगरसेवकांना विश्वासात घेऊन काम केले. विकासकामांमध्ये पक्षीय राजकारणापेक्षा शहरहिताला प्राधान्य दिले. म्हणूनच त्यांच्या कार्यकाळात अनेक महत्त्वाचे निर्णय सर्वानुमते घेण्यात आले. संगमनेरच्या विकासाचा इतिहास पाहिला तर प्रत्येक टप्प्यावर बदलत्या काळानुसार नवीन संकल्पना स्वीकारण्याचे धाडस दुर्गाताईंनी दाखवले. प्रशासनाचे संगणकीकरण असो, पर्यावरणपूरक उपक्रम असोत, सार्वजनिक सुविधा वाढविण्याचे नियोजन असो किंवा महिलांना सक्षम करण्याचा प्रयत्न असो-प्रत्येक क्षेत्रात त्यांनी विकासाची स्पष्ट दिशा दिली. त्यांच्या कार्यशैलीमध्ये प्रसिद्धीपेक्षा परिणामाला अधिक महत्त्व होते. शांत, संयमी, अभ्यासू आणि सातत्यपूर्ण काम करण्याची त्यांची पद्धत नागरिकांच्या मनात विश्वास निर्माण करणारी होती. त्यामुळेच आजही त्यांच्या कार्यकाळाची आठवण विकासाच्या दृष्टीने केली जाते. एखाद्या शहराचा विकास हा एका दिवसात किंवा एका निर्णयाने होत नाही. त्यासाठी सातत्य, नियोजन, प्रशासनाशी समन्वय आणि जनतेचा विश्वास आवश्यक असतो. दुर्गाताई तांबे यांनी या सर्व बाबींचा सुंदर समन्वय साधत संगमनेरच्या विकासगाथेत आपले स्वतंत्र स्थान निर्माण केले. आज त्यांच्या वाढदिवसानिमित्त त्यांच्या कार्याचा गौरव करताना, त्यांनी घालून दिलेला विकासाचा आदर्श, स्वच्छतेचा संस्कार, पर्यावरण संवर्धनाची जाणीव आणि सर्वसमावेशक नेतृत्वाचा वारसा नव्या पिढीला प्रेरणा देणारा आहे, असे निश्चितपणे म्हणावे लागेल. दुर्गाताई तांबे यांना वाढदिवसानिमित्त मनःपूर्वक शुभेच्छा! त्यांना उत्तम आरोग्य, दीर्घायुष्य आणि समाजसेवेची अखंड ऊर्जा लाभो, हीच सदिच्छा.

# घारगाव-कोठे बुद्रुक रोडला वाली कोण?



युवावार्ता (प्रतिनिधी)

घारगाव संगमनेर तालुक्याचा पठार भाग व पठार भागातील एक प्रमुख मार्ग म्हणून घारगाव ते कोठे बुद्रुक मार्गाची ओळख आहे. अकोले तालुक्यातील पिंपळदरी गावात असणाऱ्या येडू मातेच्या दर्शनाला लाखो भाविक याच मार्गाने जात-येत असतात. मात्र या मार्गाला आता कोणी वाली आहे की नाही असा प्रश्न जनसामान्यांकडून विचारला जात आहे.

घारगाव ते कोठे बुद्रुक या अवघ्या सात किलोमीटर रस्त्याचे काम गेल्या दोन वर्षांपासून सुरू आहे. कोठे बुद्रुक गावाजवळील मुक्ताईच्या ओढ्यातील पुलाचा प्रकारच तर थोडा अजब आहे. पावसाळ्याच्या तोंडावरती सुरू झालेल्या पुलाचे काम भर पावसाळ्यातील जुलै महिन्यात अर्धवट आहे. हजारो वाहने या मार्गाने ये - जा करताना येथे अडकत असुन अर्धवट असलेल्या नवीन पुलावर माती साचल्यामुळे वाहनांना अडचणींचा सामना करावा लागतो आहे. त्यात पाऊस जास्त झाला जर जास्त झाला तर हा पूल वाहून देखील जाऊ शकतो असं स्थानिकांकडून बोलले जाते आहे.या रस्त्यासाठी घारगाव येथे स्थानिक नागरिकांकडून उपोषण देखील करण्यात आले होते. हे उपोषण सोडवण्यासाठी अकोले विधानसभा मतदारसंघाचे आमदार डॉ. किरण लाहमटे यांनी शब्द देत हे उपोषण सोडले होते. विधानसभा निवडणुकीच्या अगोदर याचे उद्घाटन देखील केले आणि मत घेत निवडुन आले मात्र आता या रस्त्याचे पुढे काय झाले असा प्रश्न आता जनसामान्य नागरीक विचारत आहेत. आता या धो धो पावसात या रस्त्याचे काम होणार कसे व शेतकऱ्यांचा शेतमाल पुणे- मुंबईला- नाशिकला जाणार कसा? असा प्रश्न सध्या स्थानिक शेतकरी वर्गाला पडलेला आहे.

# पाचवी शिष्यवृत्ती परीक्षेत निळवंडे शाळेची यशाची परंपरा कायम

## सुजय आहेर जिल्हा गुणवत्ता यादीत



युवावार्ता (प्रतिनिधी )-

संगमनेर - जिद्द, सातत्यपूर्ण सराव आणि शिक्षकांचे योग्य मार्गदर्शन यामुळे यशाचे शिखर गाठता येते याचा प्रत्यय जिल्हा परिषद प्राथमिक शाळा, निळवंडे येथील विद्यार्थ्यांनी पुन्हा एकदा दाखवून दिले. महाराष्ट्र राज्य परीक्षा परिषद, पुणे आयोजित पूर्व उच्च प्राथमिक शिष्यवृत्ती परीक्षा (इयत्ता पाचवी) २०२५ मध्ये शाळेचा विद्यार्थी कु. सुजय दत्तात्रय आहेर याने २३० गुण मिळवत जिल्हा गुणवत्ता यादीत स्थान मिळवून शाळेच्या शिरपेचात मानाचा तुरा रोवला. विशेष म्हणजे, उन्हाळ्याच्या सुट्टीतही विद्यार्थ्यांसाठी नियमित जादा तास घेऊन त्यांची कसून तयारी करून घेण्यात आली.विद्यार्थ्यांची मेहनत, पालकांचे सहकार्य आणि शिक्षकांचे समर्पित मार्गदर्शन यांचे हे यशस्वी फलित ठरले.परीक्षेत शाळेचे एकूण नऊ विद्यार्थी शिष्यवृत्तीस पात्र ठरले. ग्रामीण भागातील विद्यार्थ्यांमध्ये गुणवत्तापूर्ण शिक्षणाची ज्योत तेवत ठेवत, सातत्यपूर्ण शैक्षणिक उपक्रमांच्या माध्यमातून शाळेने उल्लेखनीय यश संपादन केले आहे. मुख्याध्यापक रमेश निघुते, वर्गशिक्षक श्रीम.सौदामिनी सोनवणे व अनिल गाडेकर, कैलास दिघे, संजय एरंडे, तुषार फल्ले, अनिल कडलग,मंदा गायकर सर्व शिक्षकांचे गटविकास अधिकारी प्रवीण सिनारे, गटशिक्षणाधिकारी बाळासाहेब गुंड, शिक्षण विस्तार अधिकारी कैलास भागवत,केंद्रप्रमुख आशा घुले, सरपंच श्रीम. शशिकला पवार, उपसरपंच भाऊसाहेब आहेर, शाळा व्यवस्थापन समिती अध्यक्ष दत्तात्रय आहेर, तंटामुक्ती अध्यक्ष शिवाजी आहेर यांनी सर्व यशस्वी विद्यार्थी व त्यांना मार्गदर्शन करणाऱ्या शिक्षकांचे अभिनंदन केले आहे.

# लोकसेवा फाउंडेशनतर्फे गुरुपौर्णिमेनिमित्त साईभक्त मंडळांचा सन्मान सोहळा

युवावार्ता (प्रतिनिधी)

संगमनेर - दरवर्षीप्रमाणे यंदाही लोकसेवा फाउंडेशनच्या वतीने गुरुपौर्णिमा उत्सवानिमित्त श्रीक्षेत्र शिर्डीकडे पायी जाणाऱ्या साईभक्तांच्या सेवेसाठी संगमनेर ते काकडी (श्रीक्षेत्र शिर्डी पायी वारी मार्ग) या मार्गावर अन्नदान, प्रसाद वाटप व आरोग्यसेवा करणाऱ्या स्वयंसेवी संस्था व साईभक्त मंडळांचा सन्मानचिन्ह व वृक्षरोप देऊन गौरव करण्यात येणार असून साईभक्तांना प्रसादवाटप देखील करण्यात येणार आहे.

लोकसेवा फाउंडेशनच्या या उपक्रमाचे यंदाचे तिसरे वर्ष असून, गुरुपौर्णिमेनिमित्त साईभक्तांच्या हस्ते पायी वारी मार्गावर वृक्षारोपण करणे, भाविकांना प्रसादाचे वाटप करणे तसेच अन्नदान व आरोग्यसेवा करणाऱ्या स्वयंसेवी संस्था व मंडळांचा सन्मान करून त्यांच्या सेवाभावी कार्याचा गौरव करणे, हा या उपक्रमाचा मुख्य उद्देश आहे. संगमनेरमधील सामाजिक कार्यकर्ते व लोकसेवा फाउंडेशनचे सदस्य दरवर्षी मोठ्या उत्साहाने हा स्तुत्य उपक्रम राबवितात.

यावर्षीच्या गुरुपौर्णिमा उत्सव साईभक्त सेवा व सन्मान सोहळा समितीची कार्यकारिणी काल दिनांक ०५ जुलै रोजी घेण्यात आलेल्या नियोजन बैठकीत जाहीर करण्यात आली आहे. प्रकल्प प्रमुख म्हणून लोकसेवा फाउंडेशनचे संचालक किरण हासे व दीपक वनम यांची एकमताने निवड करण्यात आली आहे. तसेच यावेळी लोकसेवा फाउंडेशनच्या जिल्हा समन्वयक पदी अमोल डुकरे तर लोकसेवा फाउंडेशनच्या सहसचिवपदी अक्षय नेवासकर यांची नियुक्ती करण्यात आली असल्याची माहिती लोकसेवा फाउंडेशनचे संस्थापक अध्यक्ष प्रथमेश बेल्हेकर यांनी दिली.

यावेळी लोकसेवा फाउंडेशनचे संचालक संकेत घोडेकर, ब्रह्मा खिडके, अनिल नेहे, संभव लोढा, अथर्व देशमुख तसेच इतर पदाधिकारी व सदस्य उपस्थित होते. गुरुपौर्णिमेनिमित्त आयोजित या सेवाभावी उपक्रमात सातत्याने जनआरोग्यम जेनेरिक प्रा.ली.चे सीइओ अभिजित पाटणकर, शिवसेना उपजिल्हाप्रमुख अमरभाऊ कतारी, उद्योजक सागरशेठ नागरे व पंकजशेठ नागरे, नगरसेवक चिकूशेठ जाजू, कुंदनभाऊ लहामगे,प्रदीप कलंत्री, विवेक कोथमिरे, संकेत काकडे इत्यादी मान्यवरांच्या आर्थिक पाठबळावर हा उपक्रम पार पडतो. सदरील उपक्रमास साईभक्त मंडळे व नागरिकांनी सहभागी व्हावे,असे आवाहन लोकसेवा फाउंडेशनच्या सर्व सदस्यांच्या वतीने करण्यात आले.

पान १ वरून...

## राज्यासह...

यंदा पाऊस उशिरा सुरू झाल्याने शेतकरी चिंतेत होते. दुबार पेरणीचे संकट निर्माण झाले होते. मात्र, आता समाधानकारक पाऊस सुरू झाल्याने भात लागवडीला वेग आला असून शेतकऱ्यांमध्ये नवचैतन्य निर्माण झाले आहे. दुसरीकडे, सतत सुरू असलेल्या पावसामुळे वाकी धरणही भरावाच्या दिशेने वेगाने वाटचाल करत आहे.

गेल्या २४ तासांतील पावसाची नोंद पुढीलप्रमाणे आहे - घाटघर १४० मिमी, रतनवाडी ११३ मिमी, पांजरे ८६ मिमी, भंडारदरा ७२ मिमी आणि वाकी ६६ मिमी. कळसुबाई शिखर परिसरातही जोरदार पाऊस सुरू असल्याने कृष्णावंती नदीच्या प्रवाहात वाढ झाली असून वाकी तलावातही मोठ्या प्रमाणात पाण्याची आवक सुरू आहे.

दरम्यान, निळवंडे धरणातही पाणीसाठ्यात वाढ होत असून तेथे १,६०७ दशलक्ष घनफूट पाणीसाठा झाला आहे. त्यामुळे निळवंडे धरण १९.१८ टक्के भरले असून आगामी काळात पावसाचा जोर कायम राहिल्यास दोन्ही धरणांच्या पाणीसाठ्यात आणखी लक्षणीय वाढ होण्याची शक्यता व्यक्त केली जात आहे.








SUBSCRIBE
DAINIK YUVAVARTA
YOUTUBE CHANNEL

Daily Yuvavarta दैनिक युवावार्ता परिवर्तनाचा पुरस्कर्ता


**तहसिलदार,तथा कार्यकारी दंडाधिकारी संगमनेर, यांचे कार्यालय ता. संगमनेर,जिल्हा अहिल्यानगर**

ई-मेल : tahsildarsangamner@gmail.com दूरध्वनी (०२४२५) २२५३५३

क्र. कावी/ सेतु/ जन्म नोंद/५५४/२०२६ दिनांक - २४/०६/२०२६

### जाहिरनामा

याद्वारे सर्व लोकांना जाहिररित्या कळविण्यात येते की, अर्जदार श्री. मदन रामराव देशमुख, रा. पिंपरणे, ता. संगमनेर, जि. अहिल्यानगर यांनी दिनांक ०७/०४/२०२६ रोजी दाखल केलेल्या अर्जावरुन सुरु करण्यात आले. अर्जदार हे रा. पिंपरणे, ता. संगमनेर, जि. अहिल्यानगर येथील रहिवासी असून अर्जदार यांचा/यांची बहिण नामे मालण रामराव देशमुख यांचा जन्म मौजे पिंपरणे, ता. संगमनेर, जि. अहिल्यानगर येथे दिनांक ०१/०७/१९६२ रोजी झाला असून त्यांचा/त्यांची जन्म नोंद निबंधक तथा ग्रामविकास अधिकारी, पिंपरणे यांचे कार्यालयामध्ये उपलब्ध नसल्यामुळे त्याबाबतची नोंद घेण्याबाबतचे प्रकरण या कार्यालयात दाखल केले आहे. तरी ज्या व्यक्तींना तक्रारी/हरकती दाखल करावयाच्या असल्यास निबंधक तथा ग्रामविकास अधिकारी, कुरकुंडी यांचे कार्यालयीन नोटीस बोर्डावर जाहीरनामा प्रसिध्दी झाल्या पासुन ३० दिवसाचे आत सुटीचे दिवस वगळून लेखी स्वरुपात तक्रार या कार्यालयात दाखल करावी. मुदतीनंतर त्या तक्रारीचा विचार केला जाणार नाही, कृपया याची नोंद घ्यावी.

**तहसिलदार संगमनेर**


**पाहिजेत**
श्री गणेश डिस्ट्रीब्यूटर्स
श्री गणेश टायर्स
श्री गणेश ऑइल सेंटर
या फर्मसाठी
अकाऊंटंट - 2 जागा
पुरुष - टॅली आणि एक्सेलचे ज्ञान अवश्यक
कामाचा अनुभव आवश्यक
८९९९८६२७५९

**ड्रायव्हर पाहिजे**
ऑटोमॅटिक गाडीसाठी ०१ जागा
मॅन्युअल गेअर गाडीसाठी ०१ जागा
निर्व्यसनी ड्रायव्हर पाहिजे
– संपर्क –
9117175050

**पाहिजेत**
मे. मोहनलाल बन्सीलाल दरडा
कॉम्प्युटर ऑपरेटर (१ जागा)
– पत्ता–
श्रद्धा फर्निचर शेजारी, अकोले रोड, संगमनेर
9822426782

**पाहिजेत**
श्रद्धा एजन्सी
ड्रायव्हर - २ जागा
जे. पी. रोड, रंगारगल्ली संगमनेर, जि. अ.नगर
— संपर्क —
9665557877

**पाहिजेत**
स्पेशल सिक्युरिटी फोर्स व बाऊन्सर सर्विसेस
सिक्युरिटी गार्ड - ५
महिला - ३
सफाई कर्मचारी - ५
हेल्पर - ५
संपर्क - तिरंगा चौक, मालदाड रोड, संगमनेर
7709828846

**भाड्याने देणे**
संगमनेर बस परिसरात, नासिक- पुणे हायवे लगत (तारा पान) च्या वर ऑफिस भाड्याने देणे आहे.
संपर्क
9922008706

**पाहिजेत**
वेल्डिंग कामासाठी कामगार पाहिजेल
वेल्डर - 2 जागा
हेल्पर - २ जागा
7030125701
7972963397

**भाड्याने देणे आहे**
संगमनेर शहराच्या मध्यवर्ती ठिकाणी
२००० स्क्वेअर फिट ३ मजले, एकूण ६००० स्क्वेअर फिट बांधकाम असलेली प्रशस्त इमारत भाड्याने देणे आहे
● पिण्यासाठी नगरपालिकेचे नळ कनेक्शन ● वापरासाठी स्वतंत्र बोरिंग सुविधा
● थ्री फेज लाईट कनेक्शन उपलब्ध ● व्यवसाय, ऑफिस, क्लासेस, हॉस्पिटल, इत्यादींसाठी उत्तम जागा
पत्ता : नाशिक – पुणे हायवे, सह्याद्री कॉलेजच्या पाठीमागे, संगमनेर, ता. संगमनेर , जि. अ.नगर
- संपर्क -
9822258458

# कर्तृत्व, कणखरपणा आणि माणुसकीचा सुंदर संगम...

## सर्वांच्या लाडक्या दुर्गाताईंना वाढदिवसाच्या हार्दिक शुभेच्छा!

पाऊस कोसळत असतानाही आज दुर्गाताई तांबे यांना वाढदिवसाच्या शुभेच्छा देण्यासाठी आणि त्यांचे अभिष्टचिंतन करण्यासाठी झालेली गर्दी ही त्यांच्या लोकप्रियतेची, जिव्हाळ्याच्या स्वभावाची आणि आयुष्यभर केलेल्या सामाजिक कार्याची जणू जिवंत पावतीच ठरली. लोकांशी जपलेले प्रेमाचे नाते, सर्वांना आपलेसे करणारा स्वभाव आणि सातत्याने समाजासाठी दिलेले योगदान यामुळेच दुर्गाताई आज प्रत्येकाच्या मनात घर करून आहेत.

दुर्गाताई तांबे हे नाव उच्चारताच डोळ्यांसमोर एक कणखर, धाडसी, संवेदनशील आणि लढाऊ व्यक्तिमत्त्व उभे राहते. स्वातंत्र्यसैनिक सहकारमहर्षी भाऊसाहेब थोरात यांचा विचारांचा आणि संस्कारांचा वारसा त्यांना लाभला आहे. प्रसंग कोणताही असो, संकट कितीही मोठे असो, खंबीरपणे त्याला सामोरे जाण्याची त्यांची वृत्ती अनेक वेळा दिसून आली आहे.

कणखर व्यक्तिमत्त्वाबरोबरच त्या अत्यंत प्रेमळ, कुटुंबवत्सल आणि नातेसंबंध जपणाऱ्या आहेत. माहेरच्या थोरात परिवाराचा जितका अभिमान त्यांना आहे, तितकाच सासरच्या तांबे परिवाराचाही आहे. दोन्ही कुटुंबांतील प्रत्येक नाते त्यांनी मनापासून जपले आहे. प्रत्येकाला नावाने हाक मारत आपुलकीने संवाद साधणे, हे त्यांच्या व्यक्तिमत्त्वाचे खास वैशिष्ट्य मानले जाते.

दुर्गाताईंचा स्नेहपरिवार केवळ नातेवाईकांपुरता मर्यादित नाही. मैत्रिणी, सामाजिक कार्यकर्ते, राजकीय सहकारी आणि सर्वसामान्य नागरिक असा त्यांचा मोठा परिवार आहे. डॉ. सुधीरजी तांबे यांनी वैद्यकीय व्यवसायासोबत समाजकारणाला प्राधान्य दिल्यानंतर संग्राम पतसंस्था, संग्राम मूकबधिर विद्यालय, जय हिंद चळवळ यांसारख्या विविध उपक्रमांमध्ये दुर्गाताईंनीही तितक्याच समर्पितपणे सहभाग घेतला.



सार्वजनिक जीवनात त्यांनी संगमनेर नगर परिषदेच्या नगराध्यक्षपदाची जबाबदारी समर्थपणे सांभाळली. अनेक अडचणी, टीका आणि राजकीय आव्हानांना धैर्याने सामोरे जात त्यांनी आपले नेतृत्व अधिक सक्षम केले. विकासकामे, लोकसंपर्क आणि प्रशासनातील संवेदनशीलता यामुळे त्यांनी नागरिकांचा विश्वास संपादन केला.

सहकारमहर्षी भाऊसाहेब थोरात यांच्यानंतर माजी मंत्री बाळासाहेब थोरात यांनी राज्याच्या राजकारणात आणि सहकार क्षेत्रात उभारलेले नेतृत्व हे दुर्गाताईंसाठी नेहमीच अभिमानाचा विषय राहिले आहे. आमचा भाऊराया असा प्रेमळ उल्लेख त्या आजही बाळासाहेब थोरात यांच्याबद्दल करतात.

डॉ. सुधीरजी तांबे नाशिक पदवीधर मतदारसंघातून विधान परिषदेवर निवडून आल्यानंतर पाच जिल्ह्यांचा व्यापक जनसंपर्क सांभाळताना दुर्गाताईंनी संगमनेरची जबाबदारी समर्थपणे पेलली आणि त्यांना प्रत्येक टप्प्यावर खंबीर साथ दिली.

सामाजिक, शैक्षणिक, सांस्कृतिक आणि सेवाभावी उपक्रमांमध्ये सहभागी होणे हा त्यांच्या आयुष्याचा अविभाज्य भाग आहे. भारतीय संस्कृती, कुटुंबमूल्ये, सामाजिक बांधिलकी आणि परोपकार या मूल्यांचा त्यांनी आयुष्यभर जपलेला वारसा अनेकांसाठी प्रेरणादायी आहे.

तांबे परिवाराच्या यशातही दुर्गाताईंचे मोलाचे योगदान आहे. डॉ. हर्षल तांबे यांनी एसएमबीटी परिवाराचा विस्तार मुंबई, ठाणे, नाशिक ते छत्रपती संभाजीनगरपर्यंत यशस्वीपणे केला आहे, तर आमदार सत्यजित तांबे यांनी युवक काँग्रेसच्या राज्याध्यक्षपदापासून विधान परिषदेपर्यंतचा यशस्वी राजकीय प्रवास घडविला आहे. या दोघांच्या यशाकडे त्या समाधानाने आणि अभिमानाने पाहतात.






आज दोन सुना, नातवंडे आणि मोठ्या परिवाराच्या सहवासात त्यांचे आयुष्य अधिक समृद्ध झाले आहे. वयाची ६७ वर्षे पूर्ण करत असतानाही त्यांची ऊर्जा, सामाजिक बांधिलकी आणि राजकीय जाण आजही तितकीच प्रभावी आहे. डॉ. सुधीरजी तांबे, आमदार सत्यजित तांबे यांना त्या सातत्याने मार्गदर्शन करतात. तसेच संगमनेर नगर परिषदेच्या नगराध्यक्षा डॉ. मैथिली तांबे यांनाही विकासकामांसाठी त्यांचे मोलाचे मार्गदर्शन लाभत असून संगमनेरच्या प्रगतीसाठी त्या आजही सक्रियपणे कार्यरत आहेत.

दुर्गाताई तांबे या केवळ थोरात-तांबे परिवाराचे भूषण नाहीत, तर संगमनेरच्या सामाजिक, राजकीय आणि सार्वजनिक जीवनातील एक प्रेरणादायी नेतृत्व आहेत. त्यांचा संघर्ष, कर्तृत्व, लोकसंग्रह आणि सेवाभाव पुढील पिढ्यांसाठी प्रेरणादायी राहील.

अशा या सर्वांच्या लाडक्या, कर्तृत्ववान आणि प्रेरणादायी दुर्गाताई तांबे यांना युवावार्ता परिवाराच्या वतीने वाढदिवसाच्या मनःपूर्वक शुभेच्छा आणि निरोगी, दीर्घायुषी, यशस्वी जीवनासाठी हार्दिक अभिष्टचिंतन!

**संजय नामदेव आहिरे**
**उपसंपादक, दैनिक युवावार्ता**

# आ. डॉ. किरण लहामटे यांच्या हस्ते पिंपळगाव खांड धरणाचे जलपूजन



युवावार्ता (प्रतिनिधी)

अकोले - अकोले मुळा विभागासाठी वरदान ठरलेल्या पिंपळगाव खांड धरणाच्या जलपूजन सोहळ्याचा कार्यक्रम मोठ्या उत्साहात आणि जल्लोषपूर्ण वातावरणात पार पडला. अकोले तालुक्यात झालेल्या या महत्त्वपूर्ण कार्यक्रमास शेतकरी, नागरिक, जलसंपदा विभागाचे अधिकारी तसेच राष्ट्रवादी काँग्रेस पक्षाचे पदाधिकारी आणि कार्यकर्त्यांनी मोठ्या संख्येने उपस्थिती लावली. या कार्यक्रमाचे विशेष आकर्षण म्हणजे अकोलेचे आमदार डॉ. किरण लहामटे यांच्या हस्ते जलपूजनाचा विधी पार पडला.

यावेळी उपस्थित मान्यवरांनी पिंपळगाव खांड धरणाच्या उभारणीमुळे मुळा विभागातील शेतकऱ्यांच्या जीवनात झालेल्या सकारात्मक बदलांवर प्रकाश टाकला. धरणामुळे परिसरातील शेतीला मोठ्या प्रमाणात सिंचनाचा लाभ मिळाला असून अनेक वर्षांपासून पाण्याच्या समस्येला तोंड देणाऱ्या शेतकऱ्यांना मोठा दिलासा मिळाला आहे. त्यामुळे या धरणाकडे मुळा विभागासाठी खऱ्या अर्थाने विकासाचा आधारस्तंभ म्हणून पाहिले जात आहे. यावेळी उपस्थित मान्यवरांनी स्वर्गीय अजितदादांच्या विशेष योगदानाचा उल्लेख करत सांगितले की, त्या काळात काही प्रशासकीय अडचणी आणि नियमांमुळे हे धरण मंजूर होण्यास अडथळे निर्माण झाले होते. मात्र शेतकऱ्यांच्या मागणीचा विचार करून विशेष बाब म्हणून स्वर्गीय अजितदादांनी हे धरण मंजूर केले. त्यांनी नेहमीच जनतेचे हित जपण्याचा प्रयत्न केला आणि मुळा विभागातील शेतकऱ्यांच्या आयुष्यात समृद्धी आणण्यासाठी महत्त्वाचे योगदान दिले, असे मत यावेळी व्यक्त करण्यात आले. तसेच पिंपळगाव खांड जलाशयाला स्वर्गीय अजितदादांचे नाव देण्याचा संकल्पही यावेळी करण्यात आला. या घोषणेला उपस्थित शेतकरी आणि नागरिकांकडून उत्स्फूर्त प्रतिसाद मिळाला. अकोले तालुक्यावर निसर्गाची कृपा कायम राहिली असून यंदाच्या समाधानकारक पावसामुळे शेतकरी वर्गात आनंदाचे वातावरण निर्माण झाले आहे. पाणीसाठ्यात वाढ झाल्यामुळे आगामी काळात शेती उत्पादनातही वाढ होण्याची अपेक्षा व्यक्त करण्यात आली.

या कार्यक्रमास मा. सिताराम पाटील गायकर, साथी विनयजी सावंत, किसान सेलचे प्रदेशाध्यक्ष वसंतराव मनकर, तालुकाध्यक्ष शरदराव चौधरी, युवक अध्यक्ष अक्षय आभाळे, महिला तालुकाध्यक्ष निता ताई आवारी यांच्यासह परिसरातील अनेक मान्यवर, शेतकरी व नागरिक उपस्थित होते.

# पठार भागाची जीवनदायी मुळा अखेर वाहती



युवावार्ता (प्रतिनिधी)

हरिश्चंद्रगडाच्या पायथ्याशी उगम पावणाऱ्या मुळा नदीच्या पाणलोट क्षेत्रात दमदार पाऊस झाल्याने आंबीत व पिंपळगाव खांड धरणे ओव्हरफ्लो झाली असून, अखेर संगमनेर तालुक्याच्या पठार भागातील जीवनदायी मुळा नदी यंदा १५ दिवसांच्या उशिराने वाहती झाली आहे. नदीपात्रात मोठ्या प्रमाणात पाणी आल्याने परिसरातील ग्रामस्थ आणि शेतकऱ्यांमध्ये समाधानाचे वातावरण आहे.

हरिश्चंद्रगड परिसरातील मोठ्या पाणलोट क्षेत्रातून आलेले पावसाचे पाणी प्रथम आंबीत धरणात साचले. धरण ओसंडून वाहू लागल्यानंतर हा प्रवाह पिंपळगाव खांड धरणाकडे गेला. ६०० दशलक्ष घनफूट क्षमतेचे पिंपळगाव खांड धरणही भरून ओव्हरफ्लो झाल्याने मुळा धरणाच्या दिशेने मोठ्या प्रमाणात पाण्याचा प्रवाह सुरू झाला आणि अनेक दिवस कोरडे पडलेले मुळा नदीपात्र पुन्हा जिवंत झाले.

दरम्यान, पाणलोट क्षेत्रात समाधानकारक पाऊस झाल्याने डोंगर-दऱ्या हिरव्यागार झाल्या असून ओढे-नालेही प्रवाही झाले आहेत. त्यामुळे परिसरातील शेतकरी सध्या शेतीच्या कामात व्यस्त असून खरीप हंगामाला सकारात्मक सुरुवात झाल्याचे चित्र दिसत आहे.

मुळा नदी वाहू लागल्याने नदीवर अवलंबून असलेल्या अनेक ग्रामपंचायतींच्या पाणीपुरवठा योजनांना मोठा दिलासा मिळणार आहे. तसेच साकूरसह पठार भागात शनिवारपासून सुरू असलेल्या रिमझिम पावसामुळे जमिनीत ओलावा निर्माण झाला असून शेतकरी पेरणीच्या कामाला वेगाने लागले आहेत.

# वारकऱ्यांच्या सेवेसाठी शासनाच्या सर्व सुविधा उपलब्ध – आ. खताळ



युवावार्ता (प्रतिनिधी)

संगमनेर - रिमझिम पावसाच्या हलक्या सरी, हिरवाईने नटलेला परिसर, टाळ-मृदुंगाचा अखंड निनाद आणि 'राम कृष्ण हरी... जय जय राम कृष्ण हरी..', 'ज्ञानोबा-तुकाराम...' तसेच 'संत निवृत्तीनाथ महाराज की जय'च्या जयघोषाने संपूर्ण पारेगाव बुद्रुक परिसर रविवारी (दि. ५) भक्तिरसात न्हाऊन निघाला. या पालखीचे आमदार अमोल खताळ, खासदार राजाभाऊ वाजे, जिल्हा परिषदेचे मुख्य कार्यकारी अधिकारी आनंद भंडारी, पोलीस अधीक्षक मुम्मका सुदर्शन, प्रांताधिकारी अरुण उंडे आदींनी स्वागत केले.

श्री क्षेत्र त्र्यंबकेश्वर येथून पंढरपूरकडे निघालेल्या श्री संत निवृत्तीनाथ महाराज पायी पालखी सोहळ्याचे पारेगाव बुद्रुक (ता. संगमनेर) येथे अत्यंत उत्साहपूर्ण आणि पारंपरिक पद्धतीने स्वागत करण्यात आले. आषाढी एकादशीच्या पार्श्वभूमीवर श्री संत निवृत्तीनाथ महाराजांची पालखी हजारो वारकरी, दिंड्या, टाळकरी, मृदुंगवादक आणि महिला वारकऱ्यांसह विठुरायाच्या भेटीसाठी पंढरपूरच्या दिशेने मार्गक्रमण करत आहे. दरवर्षीप्रमाणे याही वर्षी पालखीचे पारेगाव बुद्रुक येथे आगमन होताच ग्रामस्थ, भाविक आणि प्रशासनातील अधिकारी मोठ्या संख्येने स्वागतासाठी उपस्थित होते.

यावेळी नीलम खताळ, अप्पर पोलीस अधीक्षक सोमनाथ वाघचौरे, तहसीलदार धीरज मांजरे, गटविकास अधिकारी प्रवीण सिनारे, तालुका पोलीस निरीक्षक प्रवीण साळुंखे, तालुका आरोग्य अधिकारी डॉ. कामेश टावरे यांच्यासह विविध विभागांचे अधिकारी उपस्थित होते. मान्यवरांनी पालखीचे पूजन केले. पालखीच्या स्वागतासाठी गावात आकर्षक सजावट करण्यात आली होती. पालखीचे आगमन होताच पुष्पवृष्टी करण्यात आली. शाळकरी विद्यार्थिनींनी लेझीमच्या तालावर सादर केलेल्या स्वागताने वातावरण अधिकच भक्तिमय झाले. वारकऱ्यांच्या मुखातून अखंड हरिनामाचा गजर सुरू असताना संपूर्ण परिसर विठ्ठलमय झाला होता. पालखीच्या दर्शनासाठी भाविकांनी मोठी गर्दी केली होती. अनेक वारकरी आणि महिला भाविकांनी पारंपरिक फुगड्या खेळत आनंदोत्सव साजरा केला. भाविकांच्या आग्रहास्तव आमदार अमोल खताळ आणि त्यांच्या पत्नी नीलम खताळ यांनीही वारकऱ्यांसमवेत फुगडी खेळत भक्तिरसात सहभागी होत उपस्थितांची मने जिंकली. तसेच वारकऱ्यांशी आपुलकीने संवाद साधून विचारपूस केली.


संत निवृत्तीनाथ महाराज पालखी सोहळ्याचे सलग दुसऱ्या वर्षी स्वागत करण्याचा मान मला लाभला, हे मी माझे भाग्य समजतो. मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस, उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे, सुनेत्रा पवार आणि पालकमंत्री राधाकृष्ण विखे पाटील यांच्या नेतृत्वाखाली महायुती सरकारने राज्यातील सर्व दिंड्यांतील वारकऱ्यांसाठी आवश्यक त्या सर्व मूलभूत सुविधा उपलब्ध करून दिल्या आहेत. वारकऱ्यांना प्रवासात कोणताही त्रास होऊ नये, यासाठी शासनाकडून सर्वतोपरी काळजी घेण्यात आली आहे.

**अविवाहित, नवविवाहित, चाळीशिनंतरच्या, लठ्ठ, मधुमेह, थायरॉईड, PCOD सारखे हार्मोनल डिफेक्ट असलेल्या**



**स्त्रियांच्या समस्या**

- मासिक पाळीच्या तक्रारी
- अंगावरून पांढरे जाणे
- गर्भ न रहाणे
- वारंवार गर्भपात होणे
- गर्भाशयात गाठी
- गर्भाशयाचा कर्करोग
- स्तनांची वाढ न होणे
- स्तनातून दूध न येणे
- स्तनात गाठी
- स्तनाचा कर्करोग
- योनी मार्गाची दुर्गंधी
- गुप्त अंगाला खाज
- विविध त्वचा विकार
- गुप्तरोग, गर्मी
- लघवीला जळजळ
- संभोगात रस न येणे
- संभोगा विषयीची भीती
- हस्तमैंथूनाची सवय
- लैंगिक विकृती
- मानसिक नैराश्य



**डॉ. मोना अभय मुथा**
B.H.M.S., C.G.O., D.Ac
होमिओपॅथिक कन्सल्टंट
स्त्री रोग चिकित्सक
( ३० वर्षांचा प्रदीर्घ अनुभव )

1 लाखांहून अधिक महिलांचा यशस्वी उपचार ISO मानांकन प्राप्त

**डॉ. मुथाज् होमिओपॅथिक क्लिनिक** विनायकनगर, नगर - पुणे रोड, अहिल्यानगर
www.homoeopathictreatment.in 91 30 30 90 13

